।।विद्या विनयेन शोभते।।

।।न मातृ परम दैवतम्।।

# कला व विज्ञान महिला महाविद्यालय

## मेहकर



# सप्तरंग

वार्षिकांक २०१५-१६

# विद्यापीठ गीत




## ॥ विद्यापीठ गीत ॥

विद्या चिंतन । विद्या मंथन
विद्या सर्जन । विद्या जीवन ॥

जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले
संत गाडगे बाबा तुमचे स्वप्न पूर्ण झाले ॥
कुणी न आता खुळे अडाणी, ज्ञानासह विज्ञान कळाले
पर्णकुटीतील प्रतिभेलाही, आभाळाचे पंख मिळाले
दशसूत्राचे अक्षर अक्षर, वेद नवा बोले ॥ १ जनमन...

किती रंजले, किती गांजले, किती आंधळे लुळे पांगळे
कर्मयोग निष्काम आचरून, कवेत घेता बांधव सगळे
भूतदयेच्या ओल्याव्याने, मानस मोहरले ॥ 2 जनमन...

धर्मजातीच्या पलिकडेही माणूस केवळ माणूस असतो
भेदभ्रमांचे बंध तोडूनी मानवतेचे पूजन करतो
पिढयापिढयांचे जीवन दर्शन विश्वात्मक झाले ॥ 3
जनमन सागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले ॥

// न मातृ: परम दैवतं //

धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहु-उद्देशीय संस्था संचालित

# कला व विज्ञान महिला महाविद्यालय

मेहकर जिल्हा बुलडाणा

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्न

# सप्तरंग

वार्षिकांक

२०१५-२०१६

**प्राचार्य**

डॉ एस टी साळी

**मुख्य संपादक**

डॉ एस एम पवार

# धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहु-उद्देशीय संस्था

मेहकर जिल्हा बुलडाणा

## संचालक मंडळ

| अ.क्र. | पद | नाव |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | श्री प्रतापराव जाधव |
| २ | उपाध्यक्ष | श्री विनायकराव बोडखे |
| ३ | सचिव | श्री राजेंद्र पळसकर |
| ४ | सहसचिव | श्री रमेश टाले |
| ५ | कोषाध्यक्ष | श्री मधुकरराव रहाटे |
| ६ | सदस्य | श्री मदनराव भोसले |
| ७ | सदस्य | डॉ अण्णासाहेब म्हळसणे |
| ८ | सदस्य | सौ उषा प्र. जाधव |
| ९ | सदस्य | ॲड श्री उल्हास जी.जाधव |
| १० | सदस्य | सौ शोभा व्ही जाधव |
| ११ | सदस्य | श्रीमती वर्षा पी जाधव |
| १२ | सदस्य | सौ नम्रता एस वायाळ |
| १३ | सदस्य | श्री ऋषिकेश प्र.जाधव |

## आमचे श्रद्धास्थान

# धर्मवीर दिलीपराव रहाटे



## आमचे प्रेरणास्थान

# मा.खा.श्री. प्रतापराव जाधव



# आमचे मार्गदर्शक



प्राचार्य डॉ एस टी साळी

## सप्तरंग संपादन मंडळ

१. प्रा.बी.डब्ल्यू.सोमटकर
२. प्रा.डॉ.एम.आर.शिंदे
३. प्रा.सौ.व्ही.आर.मोरे
४. प्रा.पी.आर.जुनघरे
५. प्रा.जी.बी.घायाळ



युवा महोत्सवात गीत गायन स्पर्धेत सहभागी
महाविद्यालयीन विद्यार्थीनी



युवा महोत्सवात समूहगीत गायन स्पर्धेत सहभागी
महाविद्यालयीन विद्यार्थीनी



युवा महोत्सवात लोकनृत्य स्पर्धेत सहभागी
महाविद्यालयीन विद्यार्थीनी



युवा महोत्सवात लोकनृत्य स्पर्धेत सहभागी
महाविद्यालयीन विद्यार्थीनी



रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबीर (दत्तक ग्राम उकळी)
प्रसंगी मान्यवर

# कला व विज्ञान महिला महाविद्यालय

मेहकर जिल्हा बुलडाणा

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| अ.क्र. | पद | नाव |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | श्री प्रतापराव जाधव |
| २ | पदसिद्ध सचिव | प्राचार्य डॉ एस टी साळी |
| ३ | सदस्य | श्री राजेंद्र पळसकर |
| ४ | सदस्य | डॉ सुनील भराडे |
| ५ | सदस्य | श्री गणपतराव रहाटे |
| ६ | सदस्य | ॲड श्री मनीष आर मंत्री |
| ७ | सदस्य | श्री बबनराव तुपे |
| ८ | शिक्षक प्रतिनिधी | प्रा. भा. वा. सोमटकर |
| ९ | शिक्षक प्रतिनिधी | प्रा. डॉ. स. मा. पवार |
| १० | शिक्षक प्रतिनिधी | प्रा. जी. बी. घायाळ |
| ११ | शिक्षकेत्तर प्रतिनिधी | श्री प्रताप पाटील |

# प्राध्यापक वर्ग

| | |
|---|---|
| Prin. Dr Sudhakar Tarachand Sali | Principal |
| Dr Ramesh Gulabrao Suralkar | Lecturer |
| Dr Parmeshwar Ramdas Junghare | Lecturer |
| Dr Bhanudas Wamanrao Somatkar | Lecturer |
| Dr Santosh Tukaram Kute | Lecturer |
| Dr Sangita Mangesh Khadse | Lecturer |
| Vaishali Rajiv More | Lecturer |
| Dr Savita Madhavrao Pawar | Lecturer |
| Dr Meghraj Ramhari Shinde | Lecturer |
| Dr Gajanan Baliram Ghayal | Lecturer |
| Dr Deepak Shivram Jaitalkar | Lecturer |
| Shri Nivrutti Vitthal Kapse | Lecturer |
| Shri Sunil Dattatray Dabhadkar | Lecturer |
| Shri Karbhari Eknath Kendre | Lecturer |
| Ku. Pooja Rameshwar Saste | Lecturer |
| Ku. Durga Govind Nagpure | Lecturer |
| Ku. Swati Vasudeo Pawar | Lecturer |
| Shri Gangadhar Ashru Gadekar | Lecturer |
| Vaishali Vasantrao Dhamradhikari | Lecturer |
| Ku. Pallavi Uttamrao Deshmukh | Lecturer |
| Shri Gajanan Parwarta Jare | Lecturer |
| Shri Vijay Dhananjay Rahate | Lecturer |
| Ku. Kavita Dagdu Aware | Lecturer |
| Shri Ganesh Jagdish Nagare | Lecturer |
| Ku. Swati Laxmanrao Raut | Lecturer |
| Ku, Rupali Vithoba Padole | Lecturer |

# शिक्षकेत्तर कर्मचारी

| | |
|---|---|
| **Shri.P.B.Patil** | Head Clerk |
| **Shri.R.K.Bajad** | Senior Clerk |
| **Shri.V.D.Lodhe** | Junior Clerk |
| **Shri.M.R.Mhalasne** | Library Attendant |
| **Shri.R.M.Pakhale** | Laboratory Assistant |
| **Shri.Y.A.Kale** | Laboratory Assistant |
| **Shri.O.V.Sawdatkar** | Laboratory Attendant |
| **Shri.V.R.Patil** | Laboratory Attendant |
| **Shri.G.B.Deshmukh** | Laboratory Attendant |
| **Shri.N.A.Wayal** | Laboratory Attendant |
| **Shri.S.B.Gawale** | Laboratory Attendant |
| **Shri.M.D.Hiwarkar** | Laboratory Attendant |
| **Shri.V.M.Kokate** | Laboratory Attendant |
| **Shri.S.N.Faltanker** | Peon |
| **Shri.R.R.Yatalker** | Peon |
| **Shri.R.B.Pasrate** | Peon |
| **Ku.M.B.Dakhore** | Peon |

# संपादकीय

कला व विज्ञान महिला महाविद्यालयाचा 'सप्तरंग' हा वार्षिक अंक दरवर्षी प्रकाशित होतो. शैक्षणिक सत्र २०१५-१६ चा हा वार्षिक अंक तयार करताना, त्यासाठी संपादनाचे काम करताना आनंद वाटला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.साळी यांनी माझ्याकडे ही जबाबदारी सोपविली आणि ती यशस्वीपणे पार पाडण्याचा मी प्रयत्न केला आहे. महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मा.खा.श्री प्रतापराव जाधव यांनी ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाचा उदात्त हेतू समोर ठेवून मेहकर येथे महिला महाविद्यालयाची स्थापना १९९७ मध्ये केली, तेव्हापासून आजतागायत महाविद्यालयाचा विकास होत आला आहे. सत्र २०११-१२ पासून प्राचार्य डॉ.एस.टी.साळी महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहेत महाविद्यालयाची विज्ञान शाखा मागील पाच वर्षापासून प्रगतीपथावर आहे.

महाविद्यालयाच्या कला व विज्ञान दोन्ही शाखांचे परीक्षा निकाल चांगले राहिले आहेत. या सत्रामध्ये विविध अभ्यासपूरक उपक्रम राबविले गेले. प्रत्येक विषयाच्या अभ्यासमंडळाची स्थापना करण्यात आली. काही विषयांचे लघुसंशोधन प्रकल्प पूर्ण झाले आहेत. सत्र २०१५-१६ मधील महाविद्यालयीन प्रगतीचा आढावा या अंकामध्ये घेण्यात आला आहे. याशिवाय विद्यार्थ्यांच्या साहित्यविषयक कलागुणांना आविष्कृत करण्याची संधी या वार्षिक अंकाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आली आहे. काही आवश्यक छायाचित्रेही या अंकामध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. हा अंक माहितीपूर्ण आणि वाचनीय झाला असावा, अशी खात्री वाटते.

प्रा.डॉ.सविता मा.पवार

## Vision Mission, Goals & Objectives of the college

**Vision of the Institute-**

To enlighten students of rural area and encourage them to contribute for overall development by promoting education.

**Mission Statement of the Institute-**

- "Shikleli Aai Ghara-Dara pudhe Neyi" meaning: A Woman instills the teaching that lasts a long life.

**Goals & Objectives-**

To provide education to rural students and improve their overall development.

To imbibe in them a sense of social responsibility and the true spirit of nationality.

To make Students "Ideal" in every sense of the term and provide the society an ideal citizen.

To make them "Swayam Siddh" by knowledge and skill so that they enable to earn their living.

To make them strong self respecting, self-supporting, confident and courageous to fight the atrocities that they have to face in their life.

To prepare the students to face the challenges of the competitive world.

**Core Values of the Institution-**

Public service is the prime motto.

To strengthen the community's moral and intellectual life by improving education in the community.

Participate in the problem solving activities as would be conducive to the progress of society.

Refrain the activities, which tend to promote feeling of hatred or enmity among different communities, religions or linguistic groups but actively work for national integration.

# मराठी विभाग – अनुक्रमणिका

1. भूक- कु.ज्योती केशव जाधव – बी.ए.अंतिम
2. राजकारण- कु.प्रीती राजू घनवट – बी.ए.अंतिम
3. श्रद्धा अंधश्रद्धा- कु.दिपाली प्रकाश दुनगु – बी.ए.अंतिम
4. आई विना भिकारी... कु.पूजा सुरेश गोळे – बी.एस्सी.द्वितीय
5. कॉलेज गारवा... कु.मनीषा सतीश रहाटे– बी.एस्सी.द्वितीय
6. 'आई' चारोळी... कु.जयश्री शाम रहाटे– बी.एस्सी.अंतिम

## भूक-

आज भूक निघून गेली । कुठे गेली, कोणास ठाऊक ।
परत येतो म्हणून गेली, परतल्यावर कसली भूक असेल कोणास ठाऊक । पोटाची,
मनाची, अंगाची या खिशाची कधीही मिटता न मिटणारी भूक ।
कधी स्वप्नात, कधी अलीकडची, कधी स्वप्नाच्या पलीकडची भूक ।
शशीस लाटांची, कवीस कवितेची, रतीस कामाची भूक ।
परतल्यावर कसली भूक असेल कोणास ठाऊक । भूक।।

कु.ज्योती केशव जाधव – बी.ए.अंतिम

## राजकारण-

विनाकारण केले जाते त्याला राजकारण म्हणतात,
कारणासाठी काहीही न करणे यालाही राजकारण म्हणतात.
राजकारण नसते तर काय महाभारत घडले नसते?
राजकारण असते तर काय रामायण अडले असते?
जगण्याच्या शर्यतीत कोण कुणाला ढकलतो
कुणाची तंगडी कोण बरे खेचतो, उगीच कुणाचा चिमटा का काढतो

तुझ्यापेक्षा मी श्रेष्ठ कसा दाखवतो
आयुष्याच्या करंजीत काय कमी होते सारण?
दिसते तसे नसते असते फक्त राजकारण.
कधी कोण कुणाला येईल शरण, कधी कोण कुणाचे करेल वस्त्रहरण
तिकीट मिळाल्याशिवाय येईल कसे मरण, अडला हरी धरी गाढवाचे चरण
सुसुंस्कृत समाजाला हवय कशाला राजकारण?

**कु.प्रीती राजू घनवट – बी.ए.अंतिम**

### श्रद्धा अंधश्रद्धा

माणसा पेक्षा दगड जपले जातात येथे, खरे तर अंधश्रद्धेने पुजले जातात येथे, ठेवती
जिवंतपणी उपाशी माय बापास, पंचपक्वान्नं श्राद्धात वाढले जातात येथे
आधुनिक युगात तंत्रज्ञानसिद्ध यंत्राच्या, उदघाटनी नारळ वाढविले जातात येथे,
विसरून शास्त्र आधुनिक विज्ञान वाटा, रुढी परंपरा प्रमाण मानले जातात येथे
चाललोय जरी मंगळवारी घेऊनी यान, उतारे धुपारे आजही केले जातात येथे

**कु.दिपाली प्रकाश दुनगु – बी.ए.अंतिम**

### आई विना भिकारी...

किती करावे तुझे कौतुक, शब्द अपुरे पडती माझे।
परतफेड नाही करू शकत, त्या उपकारांची तुझे ।।
अमृतवाणी मला तू पाजीलास ग पान्हा।
जसे यशोदेच्या मांडीवर कृष्ण बाळ तान्हा।।
गुण अवगुणांचा माझ्या केला तू विलय।
सर्व गुन्हे माफ होती असे तुझे न्यायालय।।
तुझ्या कुशीतली झोप आजच्या संसारात नाही।

पुढचा जन्मही तुझ्या गर्भात मिळो हि वाट मी पाही।।
जगावे पुन्हा पुन्हा येऊनी तुझ्या मी पोटी।
सर्वच दुनिया तुझ्या विना वाटे मला खोटी।।
तूच माझ्या जीवनाची पालटलीस ग काया।
साष्टांग नमन करुनी पडतो तुझिया पाया।।
प्रेम तुझे आहे आई या जगाहून भारी।
म्हणूनच स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी।।

**कु.पूजा सुरेश गोळे – बी.एस्सी.द्वितीय**

## कॉलेज गारवा...

Syllabus जरा जास्तच आहे, दर वर्षी वाटतो...
Chapters पाहून Passing चा Problem मनात दाटतो...
तरी lectures चालू राहतात डोक्यात काही घुसत नहीं....
चित्र-विचित्र figures शिवाय Board वर काहीच दिसत नाही....
तितक्यात कुठून तरी Function ची Date जवळ येते...
Sem मधले काही दिवस नकळत चोरून नेते...
नंतर lecturers Extra घेउन भरभरा शिकवत राहतात...
Problems Example Theory सांगून Syllabus लवकर संपवू पाहतात...
पुन्हा हात चालू लागतात... मन चालत नाही....
सरांशिवाय वर्गामध्ये कुणीच बोलत नाही...
Lectures संपून Submission चा सुरु होतो पुन्हा खेळ..
Journal Complete करण्यामध्ये फार फार जातो वेळ...
चक्क डोळ्यांसमोर Syllabus चुटकी सरशी संपून जातो..
सर्व मार्ग अवलंबून सुद्धा Paper का बरे सो...सो..च जातो?

कु.मनीषा सतीश रहाटे– बी.एस्सी.द्वितीय

**'आई' चारोळी...**

जीवन हे शेत आई म्हणजे विहीर
जीवन ही नौका तर आई म्हणजे तीर
जीवन ही शाळा तर आई म्हणजे पाटी
जीवन हे कामच काम तर आई म्हणजे सुट्टी

कु.जयश्री शाम रहाटे– बी.एस्सी.अंतिम



## English Department- Index

1. **Dear God - Ku.Manisha Shankar Avare, B.A.I**
2. **Life of a cupcake - Ku.Pooja Sadashiv Gunjkar, B.A.I**
3. **I'm busy... - Ku.Ujwala Gajanan Kawarkhe, B.A.II**
4. **I realized... - Ku.Arti Dilipsing Munot, B.A.II**
5. **Time - Swapnil Bhagwan Raut, B.Sc.II**
6. **Wait for the Sun - Ku.Kavita Shriram Manghale, B.A.III**
7. **Moment - Ku.Pooja Bhagwan Katare, B.A.III**

### Dear God

This brand new day I go in faith,
But I know not what lies in wait,
So dear God, this morning I pray,
Take control and lead the way.
Help me to love and trust You more
And radiate Your love to my neighbor.
Then bring me back safe and sound,
And let my praise for You abound.
**- Ku.Manisha Shankar Avare, B.A.I**

### Life of a cupcake

They put me in the oven to bake. Me, a deprived and miserable cake.
Feeling the heat, I started to bubble. Watching the others, I knew I was in trouble.
They opened the door and I started my life. Frosting me with a silver knife,
Decorating me with candy jewels. The rest of my batch looked like fools.
Lifting me up, she took off my wrapper. Feeling the breeze, I wanted to slap her.
Opening her mouth with shiny teeth inside, This was the day this cupcake died.
**- Ku.Pooja Sadashiv Gunjkar, B.A.I**

### I'm busy...

I'm busy; but not in the way most people accept.

I'm busy calming my fear and finding my courage.
I'm busy listening to my kids.
I'm busy getting in touch with what is real.
I'm busy growing things and connecting with the natural world.
I'm busy questioning my answers.
I'm busy being present in my life.
**- Ku.Ujwala Gajanan Kawarkhe, B.A.II**

**I realized...**

And then I realized
that to be
more alive
I had to
be less
afraid
so
I did it...
I lost my
fear
and gained
my whole life.
**- Ku.Arti Dilipsing Munot, B.A.II**

**Time**

Tick tock...tick tock... Life is counting down on your internal clock.
Memories that feel as if they occurred yesterday
turn to flashes of moments that seem to fade away.
People you once knew walk by without a clue.
The times you once shared exist as if you were never there.
Years fly...friends die... and you never know when you'll say your last goodbye.
Oh, how I wish I could turn back time, spend it with loved ones and cherish what once was mine.
Or to go back even more, being a kid in a candy store.

How I miss the way I used to feel on Christmas day when Santa was real.
But back to reality...back to today, family is scarce and memories continue to fade away.
Tick tock...tick tock... How I wish I could control this clock.
**- Swapnil Bhagwan Raut, B.Sc.II**

**Wait for the Sun**

When everything's darkness... And you feel so alone,
When the rain doesn't stop ... And you can't make it home,
When it feels all is lost ... And you just want to run,
It can't rain forever.... Just wait for the sun.
Dark clouds always pass.... I promise you,
We're all waiting with you.... Just wait for the sun
**- Ku.Kavita Shriram Manghale, B.A.III**

**Moment**

Take a moment. Put the worries behind. Take in the beauty around. Let it relax your mind.
Watch the golden glow, of the rising morning sun. Embrace the peaceful aura of the break of dawn.
Savor the soft caress of the gently moving breeze. Listen to its nifty tune among the swaying trees.
Enjoy the lovely scene of a floating butterfly. Graceful flight and happy tweets Of a bird perched up high.
Peruse the evening sky in its dazzling splendor. The wide and open pallet, merging shapes and colors.
Relish the loving sight of children having fun, Skipping feet and carefree voices under the setting sun.
Spare a still moment every once in a while. Take in the beauty around. Take it in with a smile.
**- Ku. Pooja Bhagwan Katare, B.A.III**

# समाजशास्त्र विभाग – अनुक्रमणिका


1. प्राचीन मूल्ये - कु.अश्विनी सोपान अंभोरे, बी.ए.अंतिम
2. अंधश्रद्धा - कु.अश्विनी सुनील इंगळे, बी.ए.अंतिम


## प्राचीन मूल्ये

आपल्या समाजात अजून तरी एक अशी पिढी टिकून आहे जी आपल्या संस्कृतीची प्रथम दर्शनी ओळख जपून आहे. Hi, Hello च्या आजच्या युगात ही मंडळी 'अभिवादन' आणि 'चरण स्पर्श' करण्याचे हे मूल्य प्राचीन काळापासून जपून आहेत. (उदा. वारकरी परंपरा).

स्त्रीचा सन्मानार्थ एखाद्या राष्ट्राला ( भारतमाता ) संबोधण्याचे उदाहरण जगात आपल्या संस्कृती शिवाय अन्य कोठे सापडणे दुर्मिळ च. आज ही आपल्या समाजात स्त्री ला मानाचे स्थान आहे. ( आणि गुलामगिरी मधून बाहेर आल्यानंतर तर तिने हक्काने टिकवून ठेवले आहे. ) हा, मात्र fashion च्या नावाखाली त्यांच्या कडून ज्या काही चुका होत आहेत, त्यातून मात्र त्या स्व-सन्मान आपल्या च कर्माने कमी करत आहेत, अस आजच सामाजिक चित्र आहे.

विनाशाच्या च्या टोकावर अजून ही तग धरून असलेले हे मूल्य काही प्रमाणात आज ही आपल्या समाजात पाहायला मिळते. विनाश एवढ्या साठी की, आज्जी, आजोबा यांचा प्रेमळ सहवास आणि संस्कारांना पारखी झालेली आजची पिढी समाजासाठी एक संकट बनून घडू लागलीय. भौतिक सुखाच्या मागे लागलेली आज ची हाय प्रोफाइल जनरेशन ही गोष्ट विसरून चालली आहे की त्यांची काहीतरी कौटुंबिक आणि सामाजिक ही जबाबदारी आहे. त्यामुळे कधी नव्हे तो भारतीय समाजाचा पाया आता कमकुवत होत असताना दिसू लागतोय. हे मूल्य टिकवणे ही काळाची एक मोठी गरज भासू लागली आहे.

वारंवार ज्याकडे समाजाचे लक्ष खेचून न्यावे लागते असे हे मूल्य आता आपल्या शेवटच्या घटका मोजत आहे, असच आता म्हणावे लागेल. ठराविक गुरुकुल शिक्षणपद्धती मध्येच मनापासून जोपासले जाणारे हे मूल्य खूप साऱ्या शाळांमधून आणि कॉलेजेस मधून दुर्मिळ झालेले चित्र आहे. पालक मुलांना हे मूल्य शिकवतात की नाही, माहीत नाही. पण समाजातील सुशिक्षित आणि अनुभवी जुने जाणते लोक सुद्धा आत्ताच्या पिढीला हे मूल्य शिकवताना दिसत नाहीत. आणि काही अंशी खुद्द शिक्षक ही आपले नैतिक मूल्य कमी होईल असे वागताना दिसतात. आपल्याला हे राष्ट्र

घडवणारी पिढी निर्माण करायची आहे, हे ध्येय विसरून चाललेले आजा चे काही शिक्षक हे सुध्दा आजच्या समाजासमोरील एक संकट आहे.

- कु.अश्विनी सोपान अंभोरे, बी.ए.अंतिम

## अंधश्रद्धा

अंधश्रद्धा या अज्ञानाचा, अगतिकतेचा भाग असतात, सृष्टीतील घडामोडींचे नियम ज्ञात झालेले नसतात, समाजव्यवस्था जन्मसिद्ध विषमतेवर आधारलेली असते आणि ही परिस्थिती दूर करण्यासाठी विज्ञानाचा व अद्ययावत कालोचित मूल्यभावांचा आधार घेतला जात नाही, तेव्हा अंधश्रद्धा निर्माण होतात आणि बळावतात. अंधश्रद्धा माणसाला दुबळा आणि अगतिक बनवतात. त्याची चिकित्सक बुद्धी आणि विवेकशक्ती नष्ट करतात. हळूहळू माणूस मानसिक गुलामगिरीत अडकत जातो. अन्य प्राण्यांपेक्षा माणूस शारीरिकदृष्ठ्या दुबळा आहे. तरीही, अन्य प्राण्यांना न साधलेली भौतिक प्रगती त्याने साध्य केली आहे, ती केवळ त्याच्या बुद्धीच्या आणि चिकित्सा वृत्तीच्या जोरावर! माणूस अंधश्रद्ध आणि अवैज्ञानिक झाला तर एकूणच समाजाच्या प्रगतीचा ओघच खुंटेल. आजपर्यंतच्या मानवी इतिहासात असे लक्षात आलेले आहे की, वैज्ञानिक जाणिवांचा विकास हेच मानवाच्या प्रगतीचे सूत्र आहे. प्रत्येक घटनेमागे कारण असते आणि ते केवळ माणसाच्याच बुद्धीला समजू शकते. सर्वच घटनांमागील कारणं आज समजली नसली तरी ती जेव्हा केव्हा समजतील त्या पद्धतींचाही उलगडा त्या त्या वेळी होत जातो. हेच ते सूत्र आहे. अंधश्रद्धांचे निर्मूलन व्हायला पाहिजे, याविषयी कोणाचेच दुमत होणार नाही. भारतात अंधश्रद्धा निर्मूलनाची परंपरा फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. महाराष्ट्रातही या कार्याला संपन्न परंपरा लाभलेली आहे. मध्ययुगीन महाराष्ट्रातील पहिले महत्वाचे प्रबोधन म्हणून संतांच्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्याकडे आपल्याला बघावे लागते. बाराव्या-तेराव्या शतकात मराठी संतांनी केलेली धर्मचिकित्सा व अंधश्रद्धाविरोधी केलेली जागृती हा अंधश्रद्धा निर्मूलनाचा महाराष्ट्रातील पहिला प्रयत्न होता, असे आपण ठामपणे म्हणू शकतो. अज्ञानी, अगतिक समाजाला ज्ञानाकडे घेऊन जाणे ही अंधश्रद्धा निर्मूलनाची पहिली पायरी असते. इंग्रज काळातील समाजसुधारकांनी 'अंधश्रद्धा निर्मूलन' हा आपला महत्वाचा कार्यक्रम मानला. विविध धर्मातील जुनाट आणि वेडगळ समजुतींच्या विरोधात त्या त्या धर्मातील अनेकांनी सडेतोड भूमिका घेतल्या. गोपाळ हरी देशमुख म्हणजेच लोकहितवादी यांनी अंधश्रद्धांवर घणाघाती हल्ले केले. त्यांच्या मतें, ईश्वराने मनुष्यास

बुद्धी देऊन इतर प्राण्यांपेक्षा वेगळे केले आहे. मनुष्यास विचारशक्ती आहे. वाचा आहे. तो बऱ्या-वाईटातला फरक करू शकतो. म्हणून सार कोणते व असार कोणते, हे त्याने ओळखले पाहिजे. असे जर झाले तर जुन्या चालीरिती मागे पडतील. त्यांची निरर्थकता जाणवेल. ज्ञान हाच पराक्रम आहे, असा सिद्धांत त्यांनी मांडला. 'आगम प्रकाश' या त्यांच्या पुस्तकात त्यांनी, याचे परिणामकारक वर्णन केलेले आहे. जातिभेद, वर्णवर्चस्व, कर्मकांडावर आंधळी श्रद्धा व त्यातून निर्माण झालेली अनैतिकता यावर राजर्षी शाहू महाराजांनी घणाघाती प्रहार केले. अतींद्रिय ज्ञान हा धार्मिक भावनेचा आणि अध्यात्माचा आधार असतो, त्याचा पायाच उखाडणारा युक्तिवाद स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केला. धर्मग्रंथात जे लिहिलेले असेल ते प्रत्यक्ष प्रमाणाने, निरीक्षणाने, अनुभवाने, प्रयोगाने सिद्ध झाले असेल तरच ग्राह्य धरावे, असा सावरकरांचा आग्रह होता. 'निरीश्वरवादी धर्म असू शकतो,' ही संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ठामपणे सांगितली. श्रीकृष्ण म्हणतात, मी देवांचा देव आहे. ख्रिस्ताने सांगितले, मी देवाचा पुत्र आहे, मोहम्मद पैगंबर स्वत:ला देवाचा प्रेषित, असे घोषित करतात. मात्र बुद्धाची भूमिका ही मार्गदर्शकाची आहे आणि बौद्ध धर्मात देवाची जागा नीतीने घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ही धर्मचिकित्सा, धर्म या शब्दाचा क्रांतिकारी अर्थ मांडते. लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, महात्मा फुले, आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, सावरकर, डॉ. आंबेडकर, शाहू महाराज, प्रबोधनकार ठाकरे अशा सर्व समाजसुधारकांच्या धर्मसुधारणेच्या मांडणीत, माणसाचे हित साधण्याचे एक प्रभावी साधन म्हणून 'मानवी बुद्धीवरील विश्वास' हाच दिसून येतो. अंधश्रद्धा निर्मूलन हे व्यापक समाज परिवर्तनाचे एक प्रमुख अंग आहे. समाजपरिवर्तनाची शिक्षण, राजकारण आणि प्रसारमाध्यमे ही तीन प्रमुख साधने आहेत. साहजिकच अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रत्यक्ष काम करताना, कधी कधी या प्रमुख तिन्ही साधनांचा एकाच वेळी विचार आणि वापरही करावा लागतो. मात्र हे काम करीत असताना 'माणूस' हाच सतत केंद्रस्थानी असावा लागतो, ठेवावा लागतो. तरच कामात सुकरता आणि कामाला समाजमान्यता मिळते. शिक्षणातून तर्कशुद्ध विचार करण्याची पद्धती अभावानेच शिकवली जाते. जिज्ञासू वृत्तीचा किंवा कार्यकारणभाव शोधणाऱ्या विज्ञाननिष्ठ दृष्टीचा संस्कार शिक्षणातून, मूल्यशिक्षणातून जाणीवपूर्वक समाजात रूजविला जात नाही. मग वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होणार कसा? भारतीय राज्यघटनेच्या 'भाग चारमधील कलम 51 क' मध्ये भारतीय नागरिकाचे मूलभूत कर्तव्य म्हणून, जी काही कर्तव्ये सांगितली आहेत, त्यामध्ये विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, मानवतावाद आणि शोधक बुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे, हे भारतीय नागरिकाचे महत्त्वाचे कर्तव्य नमूद आहे. तरीपण विविध धर्मांचे गुरु, प्रेषित अध्यात्माच्या नावाखाली जे

मेळावे, संमेलने, यात्रा, जत्रा अशा प्रकारांचे आयोजन करतात आणि त्यामध्ये विज्ञान साहित्य - साधनांचा पुरेपूर वापर करून घेतात, मात्र अनेक अवैज्ञानिक गोष्टीच लोकांच्या डोक्यात भरतात, त्यामुळे राज्यघटनेत सांगितलेले मूलभूत कर्तव्य दुर्लक्षित राहते. साहजिकच समाजात मोठ्या प्रमाणात धार्मिक असहिष्णुता, अंधश्रद्धा बोकाळतात, असे आपण पाहतो. खरंतर वैज्ञानिक दृष्टिकोनाचा फायदा हा आहे की, त्यातून अचेतन सृष्टीच्या गुणधर्मांची ओळख होते, त्याद्वारे आत्मविश्वास वाढतो, मनोव्यापार निर्भय होतो, मानसिक दहशत संपुष्टात येते आणि त्यामुळे आयुष्याची बौद्धिक व भावनिक प्रत वाढते. हे आज शिक्षणात व समाजात दिसून येत नाही वा संस्कारित होत नाही. त्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलनासारखे संवेदनशील व जोखमीचे काम अगत्याने हाती घ्यावे लागते. अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य बुद्धिप्रामाण्यवादाची बैठक घेऊनच करावे लागते. पूर्वजन्म, पुनर्जन्म अशी काही घटना विज्ञानाला अजून तरी आढळून आलेली नाही. पण समाज मात्र अशा निखालस थोतांडांवर मोठ्या प्रमाणात विश्वास ठेवून असतो. विषमतेविरुद्ध किंवा जाती व्यवस्थेविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या लढ्यांमध्ये प्राणपणाने उतरावे, असे आपल्याला वाटत नाही .त्याचे कारण हेच आहे. ज्या संतांनी जडतेला व अज्ञानाला विरोध केला त्यांना समाजातील 'जडता 'वाढविण्याचे साधन बनवले जात आहे. समाजातील अंधश्रद्धांचे समूळ उच्चाटन व्हावे, निदान काही प्रमाणात तरी काही अनिष्ट ,अघोरी, घातक अंधश्रद्धांचे प्रमाण कमी व्हावे, समाजात त्याबाबत जनजागरण व्हावे, होत रहावे यासाठी अनेक संत, समाजसुधारकांनी सामाजिक चळवळीचा पोटतिडकीने, प्रसंगी समाजाचा रोष पत्करून, हालअपेष्टा सोसून, समर्पित भावनेने आटोकाट प्रयत्न केलेले आहेत. त्यांच्या कृतिशील विचारसरणीचा वारसा काही व्यक्ती ह्या व्यक्तिगत स्वरूपातील कामातून आणि काही संघटना संघटितपणे आजही चालवीत आहेत.

- कु.अश्विनी सुनील इंगळे, बी.ए.अंतिम

## राज्यशास्त्र विभाग – अनुक्रमणिका

1. भारताची राज्यघटना - कु. अस्मिन चंदू परसुवले, बी.ए.द्वितीय
2. 'मानवाधिकार' - कु. दिपाली मोहनसिंग चव्हाण, बी.ए.द्वितीय

भारताची राज्यघटना

भारताची राज्यघटना हे भारत देशाचे संविधान किंवा पायाभूत कायदा (legal basis) आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. भारतीय संविधानावर विविध पाश्चात्य संविधानांचा प्रभाव आहे. नोव्हेंबर 26 इ.स. 1949 रोजी राज्यघटनेचा स्वीकार केला गेला व जानेवारी 26 इ.स. 1950 पासून राज्यघटना अंमलात आली. 1950 साली अमलात आलेले भारतीय संविधान मुख्यत्वे 1935 च्या भारत सरकार कायद्यावर (Government of India Act of 1935) वर आधारित आहे. ऑगस्ट 29, रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली संविधान समिती स्थापन झाली.

अनेक बैठकांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा नोव्हेंबर 26 इ.स. 1949 रोजी स्वीकारला गेला. यामुळे 26 नोव्हेंबर हा दिवस 'भारतीय संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. नागरिकत्व, निवडणूका व अंतरिम संसदेविषयीचे आणि इतर काही तात्पुरत्या बाबी तत्काळ लागू झाल्या. संविधान संपूर्ण रूपानेजानेवारी 26, 1950 रोजी लागू झाले. त्यामुळे 26 जानेवारी हा दिवस 'भारतीय प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा केला जातो.

भारताची राज्यघटना उद्देशिका (Preamble), मुख्य भाग व 12 पुरवण्या (परिशिष्टे) अशा स्वरूपात विभागली आहे. मुख्य संविधानाचे 22 विभाग असून त्यांची अनेक प्रकरणांमध्ये विभागणी केलेली आहे. सुरूवातीच्या 395 कलमांपैकीची काही कलमे आता कालबाह्य झाली आहेत. सध्या राज्यघटनेत 447 कलमे असून भारतीय संविधान जगातल्या सर्वात मोठ्या संविधानांमध्ये मोडते.

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेप्रमाणे भारत हे सार्वभौम (Sovereign) , समाजवादी (Socialist), धर्मनिरपेक्ष (Secular), लोकशाही (Democratic) प्रजासत्ताक(Republic) आहे. मूळ उद्देशिकेत समाजवादी (Socialist) व धर्मनिरपेक्ष (Secular) हे शब्द नव्हते. राज्यघटनेच्या 42 व्या दुरूस्तीद्वारे ते उद्देशिकेत घालण्यात आले.

- कु. अस्मिन चंदू परसुवले, बी.ए.द्वितीय

'मानवाधिकार'

भारताच्या घटनेने, प्रत्येक व्यक्तीला काही मूलभूत अधिकार दिले आहेत, कोणत्याही परिस्थितीत व्यक्तीच्या त्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन केले जाऊ शकत नाही. जीविताचा,

स्वातंत्र्याचा, समतेचा आणि सन्मानाने जगण्याचा हक्क प्रत्येक भारतीयाला असल्याचे घटना सांगते. या भारतीय संविधानासह अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा आणि जागतिक समुदायाने असे हक्क मान्य केले आहेत. या हक्कांची पायमल्ली होत असेल तरी ती त्वरित रोखण्याचे हक्कसुद्धा भारतीय न्यायालयांना असतात व अशाच हक्कांना/ अधिकारांना 'मानवाधिकार' म्हणून ओळखले जाते. सन१९४८ च्या मानवाधिकारच्या आंतरराष्ट्रीय परिषदांपासून इतरही अनेक महत्त्वाच्या मानवाधिकार संबंधित परिषदांवर, करारांवर व ठरावांवर भारत जागतिक समुदायाबरोबर ठामपणे उभा होता, मात्र भारतातील 'मानवाधिकार उल्लंघन' रोखण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज प्रकर्षाने जाणवत होती. भारत सरकारने त्यासाठी सन १९९३ मध्ये 'मानवाधिकार संरक्षण कायदा १९९३' संमत केला व त्यायोगे 'राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची' स्थापना झाली. या कायद्याद्वारे देशातील मानवाधिकाराची पायमल्ली रोखण्यासाठी आयोगाला स्वतंत्रपणे असे अनेक अधिकार बहाल करण्यात आले.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या त्या त्या राज्यात 'राज्य मानवाधिकार आयोगा'चे कार्यालय असून सदर मानवाधिकार आयोगाकडे आपल्या मूलभूत हक्कांच्या तसेच मानवाधिकारांच्या उल्लंघनाबाबत आपण तक्रार करू शकतो. त्याची रीतसर चौकशी होऊन आयोग योग्य ते आदेश पारित करते. काही प्रसंगात आयोग स्वत:च मानवाधिकार उल्लंघनाची दखल घेते व योग्य ते निर्देश दिले जातात. महाराष्ट्र मानवाधिकार आयोगाचे कार्यालय हे मुंबई येथे असून मानवाधिकार उल्लंघनाबाबत तेथे तक्रार करता येते. ही तक्रार लेखी स्वरूपात व्यक्तिश: अथवा टपालाने सुद्धा पाठविण्यात येऊ शकते. सर्वसामान्यांच्या सोयीसाठी व ई-गव्हर्नन्सचा भाग म्हणून आता राज्य मानवाधिकार आयोगाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने सुद्धा तक्रार नोंदविली जाऊ शकते. राज्य मानवाधिकार आयोगाची विस्तृत माहिती तसेच तक्रारीसाठी www.mshrc.gov.in हे संकेतस्थळ तर राष्ट्रीय मानवाधिकार आयोगासाठी nhrc.nic.in हे संकेतस्थळ आहे.

समाजामध्ये बालकांचे, स्त्रियांचे तसेच वृद्धांचे मानवाधिकार हनन आजही मोठ्या प्रमाणात होत आहे. आपल्या हक्कांबाबत जागृत होऊन याविरुद्ध आयोगाकडे दाद मागण्यास पुढाकार घ्यायला हवा. ज्येष्ठ नागरिकांनीही त्यांच्या हक्कांचे उल्लंघन होऊ नये, यासाठी जागरूक असले पाहिजे.

**- कु. दिपाली मोहनसिंग चव्हाण, बी.ए.द्वितीय**

# अर्थशास्त्र विभाग – अनुक्रमणिका

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ... - कु. वैशाली विश्वास मोरे,बी.ए.द्वितीय
2. इंटरनेट आणि कृषी विपणन - कु. पूजा रामेश्वर निकस, बी.ए.प्रथम

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार

बाबासाहेब शिक्षणाने अर्थवेत्ते होते. मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्राची मूलभूत पदवी प्राप्त केल्यानंतर जगातील दोन महत्त्वाच्या विद्यापीठांत त्यांना अर्थशास्त्राचे उच्च शिक्षण घेता आले. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठ आणि इंग्लंडमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स. कोलंबिया विद्यापीठात बाबासाहेब जेमतेम तीन वर्षे होते. परंतु या काळात त्यांनी अर्थशास्त्राशी संबंधित विविध २९ अभ्यासक्रम पूर्ण केले. म्हणजे साधारण वर्षाला दहा या गतीने. यावरून बाबासाहेबांची अर्थशास्त्रातील गती लक्षात यावी. पुढे मुंबईत तीन वर्षे प्राध्यापकी केल्यानंतर ते लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या अर्थशास्त्राशी संबंधित अत्यंत आदरणीय संस्थेत दाखल झाले. येथे त्यांनी लिहिलेला आणि पुढे पुस्तकाद्वारे प्रकाशित झालेला 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी' हा प्रबंध आज कित्येक वर्षांनंतरही कालबाह्य वाटत नाही, हे बाबासाहेबांच्या द्रष्ट्या बुद्धिमत्तेचे यश. चलन आणि संबंधित विषयावर त्यावेळी प्रा. केन्स ही जागतिक पातळीवरील अंतिम अधिकारी व्यक्ती. हा विषय प्रा. केन्स यांनी करून ठेवलेल्या कामाची दखल न घेता पुढे नेता येणेच अशक्य. परंतु बाबासाहेबांनी या प्रा. केन्स यांच्या मतास आव्हान दिले. प्रा. केन्स हे चलनाच्या मूल्यासाठी सुवर्ण विनिमय पद्धतीचाच अवलंब करावयास हवा, या मताचे होते. सुवर्ण विनिमय पद्धतीत देशाच्या चलनाच्या मूल्याची सांगड ही सोन्याच्या मूल्याशी घातली जाते. या पद्धतीचा अवलंब करणारे देश आपल्या कागदी चलनाचे रूपांतर निश्चित दराने सोन्यामध्ये करून ठेवतात. तसेच अशा देशांत सोन्याची किंमत सरकार निर्धारित करते. परंतु सुवर्ण प्रमाण पद्धतीत मात्र प्रत्यक्ष चलनात काही प्रमाणात सोने वापरले जाते. पारतंत्र्यातील भारतात सुवर्ण विनिमय पद्धतीने रुपयाची हाताळणी केली जावी असे ब्रिटिश सरकार आणि प्रा. केन्स आदी प्रभृतींचे मत होते. परंतु हे मत बाबासाहेबांनी अत्यंत हिरीरीने खोडून काढले. त्यांचे म्हणणे होते की, सुवर्ण विनिमय प्रमाण पद्धतीत चलनस्थैर्य येऊ शकत नाही. प्रा. केन्स आणि त्यांच्या मताचा पुरस्कार करणाऱ्या अन्यांना वाटत होते- सुवर्ण विनिमय प्रमाण पद्धतीत रुपयाची किंमत आपोआपच स्थिर

होऊ शकेल. बाबासाहेबांना ते अमान्य होते. आपले मत सिद्ध करण्यासाठी बाबासाहेबांनी इ. स. १८०० ते १८९३ या काळातील चलनमूल्यांचा धांडोळा घेतला. त्यातून मिळालेल्या दाखल्यांच्या आधारे त्यांनी साधार दाखवून दिले की, भारतासारख्या अविकसित देशात सुवर्ण विनिमय पद्धती अयोग्य आहे. खेरीज या पद्धतीत चलनवाढीचाही धोका असतो. इतकाच युक्तिवाद करून बाबासाहेब थांबले नाहीत. त्यांनी आपल्या सखोल अभ्यासाच्या आधारे ब्रिटिश सरकारवर थेट आरोप केला. बाबासाहेबांचे म्हणणे होते की, सुवर्ण विनिमय पद्धतीचा अवलंब करून ब्रिटिश सरकार रुपयाची किंमत कृत्रिमरीत्या चढी ठेवत असून, त्यामागे ब्रिटनमधून भारतात निर्यात करणाऱ्यांना जास्तीत जास्त नफा कसा होईल हाच विचार आहे. पुढे जाऊन बाबासाहेबांनी थेट रुपयाच्या अवमूल्यनाचीच मागणी केली. त्यावेळी बाबासाहेबांनी आपल्या 'प्रॉब्लेम ऑफ द रुपी' या पुस्तकात लिहिले आहे- 'रुपयाची सर्वसाधारण क्रयशक्ती जोपर्यंत आपण स्थिर करीत नाही तोपर्यंत रुपयाची किंमत अन्य कोणत्याही मार्गाने स्थिर होऊ शकत नाही. विनिमय पद्धतीत चलनाच्या दुखण्याची लक्षणे तेवढी कळू शकतात, तीत उपचार होऊ शकत नाहीत.' बाबासाहेबांच्या या आग्रहामुळे अखेर ब्रिटिश सरकारने चलनाचा तिढा सोडवण्यासाठी रॉयल कमिशनची स्थापना केली. या कमिशनसमोर बाबासाहेबांनी केलेल्या सूचना मुळातच वाचण्यासारख्या आहेत. त्यांचे म्हणणे होते- आपल्याला दोनच गोष्टी विचारात घ्याव्या लागतील. एक म्हणजे आपला विनिमयाचा दर आपण निश्चित करावा का? आणि केला तर अन्यांच्या तुलनेत त्याचे गुणोत्तर काय असावे? या वादात बाबासाहेबांनी विनिमय दरनिश्चितीपेक्षा भाववाढ नियंत्रणास महत्त्व दिले. बाबासाहेबांनी त्यावेळी यासंदर्भात जे काही लिखाण केले, प्रश्न उपस्थित केले, त्यातूनच अर्थव्यवस्थेच्या अत्यंत केंद्रस्थानी आजही असलेली एक संस्था जन्माला आली. 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' हे तिचे नाव. तेव्हा यावरून बाबासाहेबांमधील अर्थशास्त्री किती महत्त्वाचा आणि द्रष्टा होता, हे लक्षात यावे. 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी' या बाबासाहेबांच्या ग्रंथाला प्रा. एडविन केनन यांची प्रस्तावना आहे. ते प्राध्यापक होते लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये. या प्रस्तावनेत प्रा. केनन हे बाबासाहेबांची प्रतिपादन शैली आणि तीत प्रसंगी दिसणाऱ्या आक्रमकतेचा उल्लेख करतात. ही आक्रमकता प्रा. केनन यांना मान्य नाही. पण असे असूनही बाबासाहेबांच्या विचारांतील ताजेपणा लक्षात घ्यायला हवा, असे प्रा. केनन आवर्जून म्हणतात तेव्हा त्या काळातील सहिष्णुता भारावून टाकते. बाबासाहेबांनी चलन-प्रश्नास हात घालण्याआधी पंचवीस वर्षे ब्रिटिश सरकारने भारतीय चलन समिती नेमली होती. सर हेन्री फौलर तिचे प्रमुख होते. त्यामुळे ही समिती फौलर समिती म्हणून ओळखली जाते. बाबासाहेबांनी या फौलर समितीची जी काही यथासांग चिरफाड केली ती थक्क करणारी

आहे. "ज्याला ब्रिटिश सरकार फौलर यांचा बौद्धिक आविष्कार मानते, तो वास्तवात मूर्खपणा आहे," इतक्या स्पष्टपणे बाबासाहेब आपले मत नोंदवतात.

**- कु. वैशाली विश्वास मोरे, बी.ए.द्वितीय**

## इंटरनेट आणि कृषी विपणन

एकविसाव्या शतकातील माणूसही इंटरनेटच्या वेगाने धावत आहे. त्याला सर्व काही तयार हवं आहे व त्यासाठी तो पैसे मोजायला तयार आहे. त्यात ऑनलाइन मार्केटमध्ये ब-याच कंपन्या इलेक्ट्रॉनिक वस्तू, कपड़े व इतर गृहोपयोगी वस्तू आकर्षक पॅकेजिंगमध्ये घरपोच करतात; त्यामुळे शेतक-यांच्या मालालाही यामध्ये मोठा वाव आहे.

शेतमालाची 'कॅश ऑन डिलीव्हरी' - वस्तू मिळाल्यावर पैश्याच्या स्वरूपात तिची किंमत मोजतो, याच संकल्पनेला 'कॅश ऑन डिलीव्हरी' म्हणतात. या संकल्पनेवर आधारित शेतकरी आपला भाजीपाला विकू शकतो. त्यासाठी भविष्यातील आव्हाने ओळखून शेतक-यांनी वैयक्तिक किंवा गटपातळीवर या क्षेत्रात उतरण्याची व शेतमालाचे प्रक्रियेतून मूल्यवर्धन करण्याची गरज आहे. त्यामुळे काही प्रमाणात अपेक्षित दर मिळविणे व शेतीमालाचे नुकसान टाळणे शक्य होईल.

थेट भाजीपाला विक्री- योग्य बाजारपेठेअभाची किंवा प्रक्रिया न केल्यामुळे शेतमालाचे, विशेषतः भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. भाजीपाला निर्जलीकरण ह्या यावर एक उत्तम पर्याय आहे. मात्र या संकल्पनेतून शेतकरी आपला सर्व शेतमाल विकू शकतो. बाजार समितीतील लेिलाच पद्धती, मध्यस्थांचे कमिशन व उचांकी आवक यांमुळे शेतमालाचे दर पडतात. या सर्व अडचणींवर 'थेट घरपोच भाजीपाला पुरवठा' ही संकल्पना काहीशा प्रमाणात नियंत्रण आणू शकते. यासाठी शेतक-यांनी खालील गोष्टींकडे लक्ष्य देणे गरजेचे आहे.

उत्तम दर्जाचे कृषिमाल उत्पादन, अत्याधुनिक लागवड ते कृषिमाल विपणन, ग्राहक वर्गाच्या पसंतीचा अभ्यास, कीटकनाशकांचा कमीत कमी वापर, सेंद्रिय शैतीचा अवलंब, दर्जात्मक मालाची निवड, आकर्षक पॅकेजिंग, दैनंदिन व वेळेत भाजीपालापुरवठा, साप्ताहिक अथवा मासिक ग्राहक अभिप्राय व मोबाईल, सोशल नेटवर्किंग साइट्सचा प्रभावी वापर. भाजीपाल्याच्या मार्केटिंगसाठी पुणे-मुंबई यासारखी मोठी शहरे शेतकरीवर्गाला खुणावत आहेत. ही मोठी संधी ओळखून यात उतरले पाहिजे. तसेच 'नंबर फिरवा आणि भाजी मिळवा' ह्य उपक्रमसुद्धा राबवू शकतो. यात शेतकरी भाजीपाला तसेच इतरही कृषिमाल उदा. धान्य, डाळी, फळे व इतर कृषिमाल विकून

चांगले अर्थार्जन करू शकतो. काढणी पश्चात तंत्रज्ञानाच्या अभावामुळे सर्वच देशांत कृषिक्षेत्रात ब-याच प्रमाणात नुकसान होताना दिसते. या समस्येवर कृषिमाल प्रक्रिया हा उत्तम पर्याय आहे. इस्राईल तथा स्वित्झर्लंडमध्ये ५० टक्के शैतीमालावर प्रक्रिया केली जाते. भारतात शेतीमालाची मुबलक उपलब्धता आहे; मात्र योग्य व्यवस्थापन च कोशल्याअभात्री त्याचर प्रक्रिया होत नाही. योग्य व्यवस्थापनाला ज्ञानाची जोड़ दिली, तर भाजीपाला निर्जलीकरण, दुग्धप्रक्रिया आदी उद्योग शेतकरी उभारू शकतात. शेतीवरील उत्पादनाला योग्य किंमत हवी असेल, तर शेतक-यांनी शेतीमाल प्रक्रियेकडे वळावे.

**- कु. पूजा रामेश्वर निकस, बी.ए.प्रथम**



# गृह अर्थशास्त्र विभाग – अनुक्रमणिका


1. आहारामध्ये प्रथिनांचे महत्व- कु.दीक्षा भारत हिवाळे, बी.ए. अंतिम
2. बालकाचे पोषण - कु.अर्चना बबन चाटसे, बी.ए. द्वितीय


## आहारामध्ये प्रथिनांचे महत्व

महाराष्ट्रातील नागरिकांच्या आहारामध्ये प्रोटिनचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा फार कमी आहे. वजनाच्या एकूण प्रमाणाचा विचार केला तर आहारामध्ये दररोज कमीत कमी 'एक ग्राम प्रति किलोग्राम' एवढ्या प्रमाणात प्रोटिनचे सेवन असावे. शाकाहारी व्यक्तींना हे प्रोटिन आपल्या एवढ्या प्रमाणात आहारातून मिळविणे कठीण असते. शाकाहारी भोजनात डाळ, पनीर, सोया आणि दुधाचे पदार्थ प्रोटिनचे मुख्य स्रोत आहेत. जेवणत या गोष्टी प्रमाणात असल्याच पाहिजे. लहान मुलांना प्रथिने जास्त प्रमाणात लागतात, कारण त्यांचे वाढीचे वय असते आणि वाढीसाठी प्रथिनांची आवश्यकता लागते (१.५ ते २ ग्रॅम प्रति किलो- योग्य प्रमाणित वजन). प्रौढांना १ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात प्रथिने लागतात. साधारण ५० ते ६० ग्रॅम प्रथिने आपण रोज खाणे अपेक्षित असते. मुलंबाळं, गरोदर स्त्रिया किंवा अंगावर पाजणाऱ्या स्त्रिया यांना जास्त प्रथिने लागतात हे खरे असले तरी इतरांनादेखील दिवसभर केलेली कामे, व्यायाम यांमुळे होणारी स्नायूंची झीज भरून काढायला प्रथिनांची आवश्यकता असते. जास्त प्रमाणात व्यायाम करणाऱ्या आणि व्यायाम करताना अधिक वजनदार साधनांचा वापर करणाऱ्यांना प्रथिने जास्त प्रमाणात घ्यावी लागतात. जेव्हा आपण व्यायाम करतो, तेव्हा स्नायूची झीज होत असते आणि ती भरून काढण्यासाठी प्रथिने लगेच, म्हणजे व्यायामानंतर २० मिनिटांच्या आत घेणे महत्त्वाचे असते. बरेचदा लोक चुकीची प्रथिने निवडतात. खूप कबरेदकअसणारी प्रोटिन पावडर ज्यात प्रत्यक्ष प्रथिने कमी आणि इतर घटक जास्त असतात. त्यामुळे वजन उलट वाढते आणि जास्त फॅट्स (उष्मांक) असणारी प्रथिनांमुळेही (चीज, पनीर आदी) वजन किंवा शरीरातील चरबीचे प्रमाण वाढू शकते. म्हणून प्रथिने निवडताना ती योग्य आहेत की नाहीत हे आहारतज्ज्ञाला विचारणे महत्त्वाचे आहे. काही अमायनो आम्ल शरीरात तयार होत असतात तर काही तयार होऊ शकत नाहीत. जी तयार होऊ शकत नाहीत, त्यांना आवश्यक अमायनो आम्ल म्हणतात. ज्या पदार्थामध्ये सर्वच्या सर्व आवश्यक अमायनो आम्ल आहेत, त्यांना उत्तम दर्जाची प्रथिने मानले जाते. मांसाहार, अंडी, दूध

आणि दुग्धजन्य पदार्थ यांचा त्यात समावेश आहे. जे शाकाहारी आहेत, त्यांनी तृणधान्ये आणि डाळी एकत्र करून घेतले तर फायदा होतो. वरणभात, खिचडी, डाळ ढोकळी, इडली यांमध्ये तृण धान्यात जे अमायनो आम्ल कमी आहे, ते डाळीत असते आणि डाळीत जे कमी आहे ते तृण धान्यात असते आणि आपोआपच पूरक, संपूर्ण, चांगल्या दर्जाचे प्रोटीन फूड तयार होते.

- कु.दीक्षा भारत हिवाळे, बी.ए. अंतिम

बालकाचे पोषण

पहिले चार ते सहा महिने बालकाचे पोषण दुधावरच होणे योग्य असते. 'दुग्धस्त्रवण व स्तनपान' या स्वतंत्र नोंदीमध्ये स्तनपान व कृत्रिम दुग्धपान यांविषयी माहिती दिली आहे. या ठिकाणी बालकाच्या 'स्तन्यमोचनाच्या' म्हणजे अंगावरून तोडण्याच्या वयानंतरच्या पोषणाचा विचार केला आहे. बहुतेक उष्ण कटिबंधीय देशांतून स्तनपान वयाच्या दुसऱ्या वर्षांपर्यंतही चालू ठेवल्याचे आढळते. आधुनिक वैद्यकीय मतप्रणालीनुसार चार ते सहा महिन्यांनंतर किंवा जरूर पडल्यास चार ते सहा आठवड्यांनंतरही स्तनपान बंद करून बालकास थोडे घट्ट अन्नपदार्थ देण्यास हरकत नाही. काही मुले चौथ्या महिन्यापासून स्तनाग्रे चावू लागतात. या मुलांना घट्ट अन्नपदार्थ योग्य रीतीने तयार करून जिभेवर ठेवल्यास ती गिळतात. पुढील परिस्थितीत बालकास घट्ट अन्नपदार्थ देण्यास हरकत नाही : (१) सर्वसाधारणपणे स्तनपान करणाऱ्या मुलास दोन आठवडे वयात अर्धा लिटर आणि ३-६ महिने वयात तीन-चतुर्थांश लिटर दूधमिळावयास हवे. दररोज १,००० ते १,२०० मिलि. दूध मिळूनही ज्या मुलांचे समाधान होत नाही अशा मुलांना घट्ट अन्नपदार्थ द्यावेत. (२) मुलाचे वजन ६.८ ते ७.२५ किग्रॅं. असून ते वरीलप्रमाणे दूध पीत असल्यास घट्ट अन्न देण्यास सुरुवात करावी. (३) अपुरा स्तनदुग्ध-पुरवठा असल्यास तिसऱ्या महिन्यापासूनच मिश्रान्न द्यावे. (४) अति दुग्धपानाने मूल अतिलठ्ठ बनत असल्यास. (५) मातेचा आजार. मूल चांगले गिळू लागेपर्यंत मिश्रान्नाचा घट्टपणा हळूहळू वाढवावा, तसेच प्रमाणही हळूहळू वाढवावे. तेच अन्न तीन-चार दिवस सुरुवातीस फक्त चमचाभरच देऊन नंतर बदल करावा. हळूहळू केलेले बदल जठरांत्रमार्ग (जठर, लहान आतडे व मोठे आतडे यांनी मिळून होणारा अन्नमार्ग) बिघडू देत नाहीत. घट्ट मिश्रान्न व दूध दोन्ही चालू असल्यास स्तनपानापूर्वी किंवा बाटली देण्यापूर्वी घट्ट पदार्थ द्यावेत. घट्ट अन्नाचे पुढील प्रकार सुचविण्यात आले आहेत : पहिला प्रकार : (पाच ते सहा महिने). (अ) तृणधान्य : तांदूळ, मका किंवा गहू, दूध व साखर घालून आणि डाळीचे पीठ (तूर, मूग वगैरे) मिसळून पेज बनवून देणे.(आ) अंड्याचा पिवळा

बलक. (१५ दिवस वरील पदार्थ एकसारखे दिल्यानंतर बदल म्हणून वापरावयाचे पदार्थ). शिजवून चेचलेले बटाटे आणि शिजविलेल्या व चाळणीतून गाळलेल्या भाज्या. तिसरा प्रकार (आणखी पंधरा दिवसानंतर). शिजवलेले मांस बारीक वाटून; संपूर्ण अंडे, पावाचे तुकडे, बिस्किटे. या वयात बालकांना देण्याकरिता मुद्दाम बनविलेली फॅरेक्ससारखी तृणधान्यमिश्रित ⇨ बालक अन्ने मिळतात; पण ती फक्त सुस्थितीतील लोकांनाच परवडणारी आहेत. पहिले घट्ट अन्न म्हणून शिजवून चेचून दिलेली फळेही उत्तम असतात. भिजवत ठेवून मऊ केलेले खजूर, शेंगदाणे, हरबऱ्याची डाळ हे पदार्थही सहा महिन्यांनंतर द्यावयास हरकत नाही. भाज्यांची सुरुवात एका चमच्यापासून करून दिवसास चार चमच्यांपर्यंत वाढवावी. वाटाणा, टोमॅटो, गाजर व हिरव्या भाज्या उत्तम शिजवून देता येतात. मांसरस हळूहळू वाढवीत दररोज ३० मिलि.पर्यंत वाढवावा, वर्ष पूर्ण होण्याच्या सुमारास आठवड्यातून दोनदा मासे भाजून किंवा उकडून द्यावेत (तळलेले देऊ नयेत). चपातीचे तुकडे, पावाचे तुकडे, बिस्किटे दात येण्याच्या सुमारास दिल्यास चर्वणक्रियेने जबड्याला थोडाफार व्यायाम होतो. दुसऱ्या सहामाहीत क्षुधाशमन तातडीने करण्याची बालकाची इच्छा काहीशी कमी होते. या वयात आहाराच्या वेळा हळूहळू कमी करावयास लागून, दिवसातून तीन वेळा अन्न देणे योजता येते. दूध व मिश्रान्न दोन्ही चालू असल्यास त्यात कोणते किती प्रमाणात घेतले यात थोडीफार अनियमितता असू शकते. कोणतेही अन्न बळजबरीने सेवन करावयास लावू नये. अल्पसंभरण (प्रमाणापेक्षा कमी अन्न भरविणे) आणि अतिसंभरण (प्रमाणापेक्षा जादा अन्न भरविणे) कटाक्षाने टाळावे. सहा महिने ते १ वर्षापर्यंतच्या बालकाच्या दैनंदिन आहाराकरिता पुढील खाद्यपदार्थ सुचविले आहेत : दूध व फॅरेक्स १ : १ या प्रमाणात, फॅरेक्सऐवजी मेल्टम, सोयामिल्क इ. चालतील [→ बालक अन्न]. अ व ड जीवनसत्वांचे थेंब, कॅल्शियमचे पातळ औषध, बाल अमूल, भाताची पेज, मऊ गुरगुट्या भात, वरण, बटाटे,खजूर, केळी, नाचणीची पेज, खारीक, आदल्या रात्री पाण्यात भिजवलेले शेंगदाणे, चण्याची डाळ इत्यादी.

- कु.अर्चना बबन चाटसे, बी.ए. द्वितीय

# इतिहास विभाग – अनुक्रमणिका

1. छत्रपती संभाजी महाराज -कु.सुवर्णा दादाराव खरात, बी.ए.प्रथम
2. शिवकालीन किल्ल्यांचे जलव्यवस्थापन -कु.सीमा संजय आराख, बी.ए.अंतिम

## छत्रपती संभाजी महाराज

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे सुपुत्र, स्वराज्याची स्थापना करणे तर सहज नव्हतेच त्यासोबतच स्थापन झालेल्या स्वराज्याला टिकवून ठेवणे गरजेचे होते आणि ते कार्य करून दाखवले स्वराज्याचे रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांनी. वाघाच्या जबड्यात हाथ टाकुन त्याचे दात मोजण्याची ताकद ठेवणारे संभाजी महाराजांनी वयाच्या ३२ व्या वर्षी १२० पेक्षा जास्त युद्ध जिंकले होते. ज्यांना पाहून मृत्यू सुद्धा त्यांच्या समोर नतमस्तक होईल.छत्रपती संभाजी महाराजांची संपूर्ण कारकीर्द तेजोमय होती. अगदी लहान असल्यापासून त्यांच्यावर अनेक संकटे आली. त्या संकटांवर पाय रोऊन उभे न राहता संभाजी महाराजांनी समर्थपणे झेपही घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांनंतर स्वराज्याची धुरा सक्षमपणे आपल्या हातात घेऊन संपूर्ण हिंदुस्थानाला तोंडात बोटे घालायला लावणारा प्रचंड पराक्रम संभाजी महारांजी केला. छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर किंवा त्यानंतरही अनेक मोहिमा संभाजी राजेंनी यशस्वीपणे राबवल्या. कोणत्याही मोहिमेत त्यांना कधीच अपयश आले नाही.

छत्रपती संभाजी महाराजांना टक्कर देईल, असा योद्धा तत्कालीन हिंदुस्थानात नव्हता. संभाजी राजे हे असामान्य व्यक्तिमत्त्व होते. अचाट धैर्य, अजोड पराक्रम, असमान्य शौर्य, प्रयत्नांची पराकाष्ठा, अनेक भाषांवर प्रभुत्व, संस्कृत पंडित, धर्माभिमानी, व्यासंगी, आदर्श महावीर, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण अशा अनेक क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व त्यांनी गाजवले. संभाजी राजे दोन वर्षांचे असताना सईबाईंचे अकाली निधन झाले. त्यानंतर त्यांचा सांभाळ राजमाता जिजाऊंनी केली. केशवभट आणि उमाजी पंडित यांनी संभाजी राजेंना उत्तम शिक्षण दिले. सुरुवातीच्या काळात त्यांची सावत्र आई सोयराबाई यांनीही त्यांच्यावर खूप माया केली. अनेक ऐतिहासिक नोंदींप्रमाणे संभाजीराजे अत्यंत देखणे आणि शूर होते. लहान असल्यापासूनच संभाजी महाराजांनी राजकारणातील डावपेच, गनिमी कावा अगदी भराभर आत्मसाद केले.संभाजी राजेंनी वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी बुधभूषण हा ग्रंथ लिहिला. तीन भागांतील बुधभूषण या

ग्रंथात काव्यालंकार, शास्त्रे, संगीत, पुराणे, धनुर्विविद्या यांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आहे.छत्रपती संभाजी महाराज हे राज्यकारभारातही अत्यंत निपूण होते. ते कुशल संघटक होते. छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे पुढे छत्रपती झाल्यावर संभाजी महाराजांनीही अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केली होती. यामध्ये पंतप्रधान म्हणून निळोपंत पिंगळे, चिटणीस म्हणून बाळाजी आवजी, सेनापती म्हणून हंबीरराव मोहिते, न्यायाधीश म्हणून प्रल्हाद निराजी, पंत सुमंत म्हणून जनार्दन पंत, पंडितराव दानाध्यक्ष म्हणून मोरेश्वर पंडितराव, पंत सचिव म्हणून आबाजी सोनदेव, पंत अमात्य म्हणून दत्ताजी पंत, पंत अमात्य म्हणून अण्णाजी दत्तो यांची नियुक्ती करण्यात आली होती.

**-कु.सुवर्णा दादाराव खरात,बी.ए.प्रथम**

## शिवकालीन किल्ल्यांचे जलव्यवस्थापन

गडकिल्ल्यांवरील पाण्याचे महत्त्व रामचंद्रपंत अमात्य (छत्रपती शिवाजी महाराजांनी नेमलेल्या अष्टप्रधान मंडळातील राजनीतीचे प्रधान) यांच्या आज्ञापत्रात दिले आहे - "... तसेच गडावरी आधी उदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाही आणि ते स्थल तो आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी खडक फोडून तली - टाकी पर्जन्यकालापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे ऐसी मजबूत बांधावी." गड किल्ले यांची उभारणी करताना आधी उदकपाण्याची सोय करूनच किल्ला बांधावा या विचारातून शिवरायांची दूरदृष्टी आढळते. आज्ञापत्रातील पुढील उद्गारांतून पाण्याचे महत्त्व स्पष्ट होते- "गडावर झराही आहे, जैसे तैसे पाणी पुरते, म्हणून तितक्यावर निश्चिती न मानावी. उद्योग करावा. कि निमित्य की जुझामध्ये भांडियाचे आवाजाखाली झरे स्वल्प होताना आणि पाण्याचा खर्च विशेष लागते, तेव्हा संकट पडते या करिता तैसे जागा जखिरियाचे पाणी म्हणोन दोन - चार तली - टाकी बांधून ठेवून त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे. गडाचे पाणी बहुत जतन राखावे"लढ्यांच्या वेळी दारूगोळ्यांमुळे जिवंत झरे आटण्याचा संभव असतो, त्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून प्रत्येक गडावर पाणीसाठा असला पाहिजे. कृत्रिमपणे साठवून ठेवलेल्या त्या पाण्याला 'जखिरियाचे पाणी' असे म्हटले जात असे. ते पाणी सडू नये म्हणून काळजी घेतली जात असे.रायगड ही शिवरायांची राजधानी होती. तेथील पाणीव्यवस्था आदर्श आहे. रायगडाची पुनर्रचना करताना, हिरोजी इंदुलकर यांनी कोरवून घेतलेल्या एका शिलालेखात पुढील माहिती आहे – "विहिरी, टाकी, तळी, उपवने, मार्ग, स्तंभ, हत्तीशाळा आणि राजवाडे इत्यादी नाना प्रकारची बांधकामे आणि खोदकामे शिवछत्रपतींनी रायगडावर करविली." रायगडावरील वस्ती ठिकठिकाणी विखुरलेली होती. त्या ...वरील सर्व लोकांना पाणीपुरवठा होईल अशा दृष्टिकोनातून तलाव खोदलेले आहेत.

रायगडावर हत्तीतलाव, गंगासागर, कुशावर्त, कोळिंब, बामण टाके, काळा हौद, हिरकणीचा तलाव असे सात भलेमोठे तलाव आहेत. बालेकिल्ल्यामधील पडणाऱ्या पावसाचे पाणी, त्याचे भूपृष्ठाखालील मार्ग शोधून काढून, त्याच्या आधारे कुशावर्तेश्वराच्या मंदिराशेजारील एका जलमंदिरात जमा होऊन, तेथून ते कुशावर्त तलावात साठवले जाते. त्या प्रकारची प्रणाली इतर कोणत्याही दुर्गावर आढळलेली नाही. जलमंदिर आज भग्नावस्थेत आहे. आजही, रायगड दर्शनासाठी जे लोक येतात, त्यांना गंगासागर तलावातील पाणी उपलब्ध करून दिले जाते.रायगडावर खडकात खोदलेली जवळ जवळ सव्वीस टाकी आहेत. काही टाक्यांची रचना स्नानगृहे आणि शौचकूप यांसाठी केली आहे. छत्रपतींच्या वाड्याच्या दक्षिणेस आणि तटबंदीच्या विरूद्ध दिशेला- उत्तरेला एक द्वार आहे. त्या द्वाराला लागून सुमारे सात फूट रुंद, चौदा फूट लांब आणि पाच फूट खोल असा चिरेबंदी हौद आहे. हौदाच्या तळाशी जलविसर्गासाठी दगडांच्या जाळ्या बसवलेल्या आहेत. तो विसर्गमार्ग बाहेरच्या बाजूस असलेल्या शौचकुपांच्या जलविसर्गाशी थेट जमिनीखालून जोडला आहे. भूमिगत जलविसर्जनाचे मध्ययुगातील ते अत्यंत दुर्मीळ असे उदाहरण आहे. त्या प्रकारची व्यवस्था हिंदुस्थानातील इतर कोणत्याही प्राचीन वा मध्ययुगीन दुर्गात वा प्रासादामध्ये आढळलेली नाही असे मिलिंद पराडकर यांनी नमूद केले आहे. त्यातील बरेचसे बांधकाम भग्नावस्थेत आढळते.पाण्याच्या टाक्याचा वापर जसा सृजनांसाठी केला गेला तसाच विध्वंसासाठीही पाण्याची टाकी कोरली गेली होती. त्याचे उत्तम उदाहरण रायगड किल्ल्यावर पाहायला मिळते. रायगडाच्या महाद्वारच्या वरच्या बाजूला कड्याच्या पोटात चार टाकी आहेत. शत्रू सन्याने जर रायगडाच्या महाद्वारापर्यंत धडक मारली तर ही टाकी फोडून टाकायची. या टाकीतील पाण्याचा लोंढा डोंगर उतारावरून येताना आपल्या सोबत दगड, माती, चिखल घेऊन येईल आणि दरवाजातील शत्रू वर धडकेल अशी योजना करण्यात आली होती.

**-कु.सीमा संजय आराख,बी.ए.अंतिम**




रस्ता सुरक्षा अभियानात सहभागी
महाविद्यालयीन विद्यार्थीनी



वृक्षारोपण करतांना
महाविद्यालयीन विद्यार्थीनी



म.गांधी व लाल बहादुर शास्त्री जयंती समारोह
प्रसंगी विद्यार्थी व मान्यवर



अभ्यासमंडळ उद्घाटन प्रसंगी व मान्यवर



मराठी राजभाषा गौरव दिन प्रसंगी व मान्यवर



महिला दिन प्रसंगी विद्यार्थीनी व मान्यवर



युवती सक्षमीकरण शिबीराचे वेळी मा.सौ.राजश्रीताई जाधव यांचेसह महिला शिक्षक वर्ग



शासकीय विज्ञान संस्था औरंगाबाद येथील प्रयोग शाळेस भेटी प्रसंगी विद्यार्थीनी



शासकीय विज्ञान संस्था औरंगाबाद येथील प्रयोग शाळेस भेटीचे प्रसंगी विद्यार्थीनीना मार्गदर्शन कारतांना मान्यवर




देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद येथे शैक्षणिक सहल अंतर्गत भेट देणारा महाविद्यालयीन चमू



वेरूळ लेणी येथे शैक्षणिक सहल अंतर्गत भेट देणारा महाविद्यालयीन चमू

# शारीरिक शिक्षण विभाग

महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभाग प्रा.डॉ.संगीता खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहे. महाविद्यालयाच्या शैक्षणिक नियामाकानुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या विभागामार्फत विविध कार्यक्रम साजरे केले जातात. यावर्षी पुढील कार्यक्रम शारीरिक शिक्षण विभागामार्फत घेण्यात आले.

| अ.क्र. | कार्यक्रम | अहवाल |
|---|---|---|
| १ | २१ जून २०१५ | **अंतरराष्ट्रीय योग दिन -** प्रस्तुत कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एस.टी साळी हे होते, प्रमुख अतिथी म्हणून स्व.पंजाबराव जाधव माध्य.व उच्च माध्य चे प्राचार्य श्री पी.टी.बोरकर हे होते. यावेळी महाविद्यालयाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालिका डॉ संगीता खडसे यांनी उपस्थितांना विविध योगासनांचे प्रात्यक्षिक देऊन महत्व स्पष्ट केले. प्रमुख अतिथी आणि अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्व प्रतिपादन केले. |
| २ | २० जुलै २०१५ | **वृक्षारोपण-** प्रस्तुत कार्यक्रमाचे प्राचार्य डॉ.एस.टी साळी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते, यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थी आणि शिक्षकांनी महाविद्यालय परिसरात विविध जातीच्या व्रीक्षांची लागवड केली. पूर्वी लावलेल्या झाडांची काळजी तसेच नवीन रोपांची लागवड करण्यात आली. |
| ३ | २९ ऑगस्ट २०१५ | **जागतिक क्रीडा दिन-** प्रस्तुत कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.टी साळी हे होते, प्रमुख अतिथी म्हणून हे होते. प्रमुख अतिथी म्हणून एम.ई.एस. महाविद्यालयाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ प्रमोद हुंबड हे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालिका डॉ संगीता खडसे यांनी उपस्थितांना जागतिक क्रीडा दिनाचे महत्व स्पष्ट केले. प्रमुख अतिथी आणि अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना विविध खेळांचे दैनंदिन जीवनात महत्व विषद केले. |

| | | |
|---|---|---|
| ४ | २१.०१.२०१६ | क्रीडा सप्ताह- प्रतिवर्षी प्रमाणे महाविद्यालयात क्रीडा सप्ताह चे आयोजन करण्यात आले. यात विविध वर्गांतर्गत कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, क्रिकेट आदी खेळासह अथलेटीक्स चे आयोजन करण्यात आले. |

विद्यापीठस्तरीय क्रीडा स्पर्धा सहभाग-

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती च्या वतीने प्रतिवर्षी घेण्यात येणारा क्रीडा महोत्र्सव २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षात माउली ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशंस कॉलेज ऑफ इंजिनियरिंग व टेक्नोलॉजी, शेगाव, श्री शिवाजी कला व विज्ञान महाविद्यालय, मोताळा, मातोश्री देशमुख महाविद्यालय, अमरावती, श्री राठोड कला व विज्ञान महाविद्यालय, मुर्तीजापूर आणि जनता महाविद्यालय, मलकापूर येथे संपन्न झालेल्या आंतरमहाविद्यालयीन विद्यापीठस्तरीय क्रीडा स्पर्धामधेही महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे कबड्डी, व्हॉलीबॉल, कबड्डी महिला, खो-खो, व्हॉलीबॉल महिला, रेसलिंग महिला या क्रीडा प्रकारात सहभाग नोंदवला व विशेष प्राविण्य मिळवले. यावर्षीच्या क्रीडा महोत्सवात शुभम शेंडे, मंगेश खेत्री, अविनाश सवडतकर, ओम शेवाळे, अविनाश बंगारे, विशाल धोंडगे, शिवशंकर जवंजाळ, प्रदीप बोडके, शुभम खिल्लारे, सुरज गवई, रविराज डुकरे, गोपाळ अल्लाद, अविनाश बडगिरे, पूजा मुरडकर, उषा चव्हाण, कोमल वर्मा, दीक्षा गवई, मनीषा चव्हाण, पूजा तनमणे, सपना नन्नवरे, अश्विनी जोहरले, पायल खबाळे, अशा गवई, सुवर्ण खरात, कविता सदार, अश्विनी आव्हाळे, पूजा देशमुख, स्वाती लोंढे, दिपाली वानखेडे, दिपाली चव्हाण, सुषमा भगत, पुष्पा इंगळे, माधुरी नवले, पल्लवी अंभोरे, संध्या गायकवाड, प्रियंका दवंडे, माधुरी कटारे, सपना गवई इत्यादी खेळाडूंनी सहभाग घेतला.

कबड्डी

एक भारतीय सांघिक खेळ. हुतुतू या नावानेही हा खेळ प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात या खेळाबद्दल विशेष आवड आहे. संत तुकाराम महाराजांच्या अभंगात या खेळाचा उल्लेख हमामा, हुंबरी, हुतुतू अशा नावांनी केलेला सापडतो. बंगालमध्ये 'डुडू', दक्षिण भारतात 'चेडुगुडु' व उत्तर भारतात 'कबड्डी' अशा विविध नावांनी हा खेळ पूर्वीपासून खेळला जात आहे. पूर्वी या खेळाचे स्वरूप अनियमित होते. खेळाडूंच्या संख्येला व क्रीडांगणाला मर्यादा नव्हती. दोन संघांतील एकेका खेळाडूने आलटून पालटून श्वास रोखून विशिष्ट शब्दोच्चार करीत विरुद्ध संघाच्या क्षेत्रात चढाई करत जावयाचे, त्यातील प्रतिस्पर्ध्यांना हाताने किंवा पायाने स्पर्श करून त्यांना बाद करावयाचे व

त्यांच्या पकडीत न सापडता दम संपण्यापूर्वीच परत आपल्या क्षेत्रात यावयाचे. चढाई करणाऱ्याचा दम जाईपर्यंत बचाव करणारांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न करून मध्यरेषेला स्पर्श करावयास प्रतिबंध करावयाचा हा या खेळाचा मुख्य गाभा होय. दम गेला, तर तो खेळाडू बाद होतो. परंतु दम जावयाच्या आत सुटून मध्यरेषेला त्याने स्पर्श केला तर त्याला पकडणारे सर्व खेळाडू बाद होतात. आता नव्या नियमांनी हा खेळ बांधला गेल्याने त्यात शिस्त येऊन वैयक्तिक व सांघिक कौशल्याला पुष्कळच वाव मिळाला आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य शिक्षणद्वारे करत असताना तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे केले जात आहे. तरुणांमध्ये समाजसेवेची जाण झाल्यानंतर त्याचाच पुढचा टप्पा म्हणजे राष्ट्रसेवा होय. शिक्षण क्षेत्रातून सेवासंस्कार तरुणांवर व्हावा, तरुणांकडून राष्ट्रसेवा घडावी, युवाशक्तीचा उपयोग राष्ट्राला व्हावा, या हेतूने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना राबविल्या जाते. प्रस्तुत शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे पुढील कार्यक्रम राबविले गेले.

| अ.क्र. | कार्यक्रम | अहवाल |
|---|---|---|
| १ | २७ ऑगस्ट २०१५ | राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या उद्घाटनाचा आणि त्याचबरोबर उद्बोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून लोकमत वृत्तपत्राचे पत्रकार श्री गजानन गारोळे हे तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.टी साळी हे होते. |
| २ | ३१ ऑगस्ट २०१५ | **स्वच्छता अभियान** : सद्भावना पंधरवडा निमित्त परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये विशेषतः महाविद्यालयीन परिसरातील गाजरगवत निर्मुलन करण्यात आले. तसेच महाविद्यीन परिसर स्वच्छह करण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| ३ | ३ सप्टे २०१५ | **रांगोळी व चित्र प्रदर्शन स्पर्धा**- सद्भावना पंधरवडा निमित्त महाविद्यालयात रांगोळी व चित्र प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली. सदर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. पुष्पा इंगळे, द्वितीय क्रमांक कु.मनीषा चव्हाण, तृतीय क्रमांक कु.सुवर्णा खरात या विद्यार्थीनिनी प्राप्त केला. |
| ४ | ५ सप्टे २०१५ | **स्वयंशासन उपक्रम** - डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून राजश्री कॉन्वेंटच्या मुख्याध्यापिका सौ सरिता खंडेलवाल तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस टी साळी हे उपस्थित होते. सदर दिवशी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून स्वयंशासन उपक्रम राबवण्यात आला. |
| ५ | ९.९.२०१५ | **निर्भय युवा अभियान**- राष्ट्रीय सेवा योजना व मेहकर पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने निर्भय युवा अभियान राबविण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मेहकर पोलीस स्टेशन चे ठाणेदार श्री मोतीचंद राठोड हे आणि अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस टी साळी हे उपस्थित होते. |
| ६ | २४.९.२०१५ | **रक्तगट तपासणी**- राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त महाविद्यालयात रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिरामध्ये डॉ दीपक जैतालकर यांनी महाविद्यालातीन विद्यार्थ्यांचे रक्तगट तपासणी करून दिली. यावेळी त्यांनी उपस्थित विद्यात्थ्यांना रक्तगट तपासणीचे महत्व समजावून दिले. सदर शिबिराच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस टी साळी हे उपस्थित होते. |

| | | |
|---|---|---|
| ७ | १०.१०.२०१५ | **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन-** महाविद्यालयांमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून मेहकर येथील शितल अकॅडमीचे संचालक श्री रोहित चव्हाण हे उपस्थित होते याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वरूप व महत्त्व विशद केले तसेच विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यवहारासाठी विज्ञान तंत्रज्ञान कृषी उद्योग इत्यादी क्षेत्रातील अद्यावत ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी इंग्रजीचा वापर अनिवार्य आहे हे पटवून दिले या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस.टी. साळी हे उपस्थित होते |
| ८ | २५.११.२०१५ | **रक्तदान शिबिर** - संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय खासदार श्री प्रतापराव जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले या शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी व शहरातील इतर नागरिकांनी रक्तदान केले याप्रसंगी एकूण शंभर रक्तदात्यांनी रक्तदान केले या शिबिराच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधकारी डॉ. संगीता खडसे यांनी परिश्रम घेतले |
| ९ | ०१.१२.२०१५ | **एड्स विषयक मार्गदर्शन-** या कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून मेहकर येथील प्रख्यात डॉक्टर डॉ जानवी सावजी या उपस्थित होत्या यावेळी त्यांनी एड्स रोगाची लक्षणे व ते टाळण्यासाठी चे उपाय याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले, एड्स ग्रस्त लोकांबाबत समाजामध्ये सकारात्मकता असावी असे प्रतिपादन केले. |

| | | |
|---|---|---|
| १० | ०७.१२.२०१५ | **रस्ता सुरक्षा अभियान** - महाविद्यालयाच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस टी साळी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या १०० विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमाच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा अभियान राबविले यामध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, वाहनचालकांची संवाद, रोड शो, पथनाट्य, कार्यशाळा असे अनेक उपक्रम राबविले गेले यावेळी वाहन चालविताना सुरक्षा बेल्टचा वापर करणे, हेल्मेटचा वापर करणे, क्षमतेपेक्षा अधिक लोक न बसवणे इत्यादी बाबींचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. |
| ११ | २०.१२.२०१५ | **संत गाडगेबाबा पुण्यतिथी** - संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त मेहकर बसस्थानक स्वच्छता घेण्यात आली, यावेळी विद्यार्थ्यांनी मेहकर बस स्थानक व परिसर स्वच्छ केला, यावेळी झालेल्या छोट्याशा कार्यक्रमात मेहकर येथील श्री किसन सारडा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आपल्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस टी साळी यांनी संत गाडगेबाबांचे विचारधारा अंमलात आणण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. |
| १२ | २२.१२.२०१५ | **स्त्री आरोग्य मार्गदर्शन व तपासणी**- या कार्यक्रमात स्त्री आरोग्य विषयक विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली यासाठी तज्ञ म्हणून मेहकर येथील प्रख्यात डॉक्टर डॉ. आव्हाळे हे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस टी साळी उपस्थित होते. |
| १३ | २३.०२.२०१६ | **संत गाडगेबाबा जयंती उत्सव कार्यक्रम**- महाविद्यालयामध्ये स्वच्छतेचे दूत व विज्ञानवादी संत गाडगेबाबा महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा डॉ सुनील दाभाडकर उपस्थित होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री पी टी बोरकर हे उपस्थित होते. |

| | | |
|---|---|---|
| १४ | २७.०२.२०१६ | कायदेविषयक कार्यशाळा - सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा गणेश नागरे हे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मेहकर येथील विख्यात वकील श्री श्याम काळे हे उपस्थित होते, यावेळी त्यांनी महिलाविषयक विविध कायद्याचे महत्त्व प्रतिपादन केले, सदर कार्यक्रमाला महाविद्यालयाचे बहुसंख्य प्राध्यापक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या |
| १५ | ०८.०३.२०१६ | जागतिक महिला दिन - जागतिक महिला दिना निमित्त महिला सक्षमीकरण कार्यशाळा आयोजित करण्यात आली या कार्यक्रमांमध्ये बेटी बचाव बेटी पढाव अभियान कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून मेहकर येथील महिला विधिज्ञ दिपाली लोहिया, मेहकर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोतीचंद्र राठोड तसेच पोलिस हेडकॉन्स्टेबल मोरे हे उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.टी. साळी हे उपस्थित होते. |

**रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबीर-** दिनांक ०१.०१.२०१६ पासून रासेयो च्या विशेष शिबिराचे आयोजन बाबत पूर्वतयारी सुरु करण्यात आली. सदर शिबीर दिनांक ३ ते १० जानेवारी दरम्यान दत्तक ग्राम उकळी येथे संपन्न झाले.

**विद्यापीठ युवा महोत्सवात सहभाग-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीच्या वतीने घेण्यात येणारा सन २०१५-२०१६ चा युवा महोत्सव गो.से.महाविद्यालय खामगाव येथे दिनांक २९.०९.२०१५ ते ०२.१०.२०१५ घेण्यात आला. या युवा महोत्सवात महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनिनी लोक नृत्य, समूह नृत्य, एकांकिका, गीतगायन, समूहगान आदी विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये भाग घेतला. युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या कलावंत विद्यार्थीनीमध्ये कु प्रतीक्षा गजानन तोटे, कु अस्मिता अशोक इंगळे, कु पुनम मारोती चौधरी, कु निशिगंधा धनंजय जामदार, कु विशाखा डोंगरे, कु श्वेता महावीर धोंडगे, कु जया विक्रम अंभोरे, कु कविता दिलीप सदर, कु प्रियंका मुरलिधर मोरे, कु शितल सुनील इंगळे, कु कोमल राजेंद्र वर्मा, कु आश्विनी प्रकाश आखरे, कु आश्विनी संजय जोहरले, कु मेघा गजानन सुरोशे, कु संतोषी संजय जोहरले, कु दिक्षा कैलास गवळी यांचा सहभाग होता.

# ग्रंथालय विभाग

ग्रंथ हेच गुरू या उक्तीप्रमाणे महाविदयालय शिक्षणात ग्रंथालयाचा अत्यंत महत्वाचा वाटा असतो उच्च 'शिक्षणामध्ये विदयार्थ्यांनी स्वयं: अध्ययन करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी त्यांच्या मध्ये वाचनाची गोडी वाढवण्यासाठी संशोधन वृत्तीमध्ये वाढ होण्यासाठी अध्ययन अध्यापन कौशल्य विकसित होण्यासाठी ग्रंथालयाचे अनन्य साधारण महत्व आहे.

महाविदयालयीन विदयार्थी, प्राध्यापक ,संशोधक यांना वेळोवेळी लागणारे पाठयपुस्तके संदर्भ ग्रंथ वेगवेगळया विषयावरचे मासिके, पाक्षिके ,वार्षिक अंक उपलब्ध करून दयावे लागतात व त्यांची वाचनाची तृष्णा भागवावी लागते. यासाठी विविध विषयावरची पुस्तके ,संदर्भग्रंथ विश्वकोष त्याना उपलब्ध करून दयावे लागतात.

खऱ्या अर्थाने ग्रंथालयाचे जनक डॉ. एस.आर रंगनाथन यांनी सांगितलेली पाच तत्वे अंगिकार करून त्या प्रकारच्या सेवा वाचकांना उपलब्ध करून देणे हेच ग्रंथालय विभागाचे मुख्य कार्य आहे. यासाठी आमच्या महाविदयालयीन ग्रंथालयातुन वाचकांना /विदयार्थांना अधिकाधिक सेवा कमीत कमी वेळेत देऊन त्यांच्या शैक्षणिक ,सामाजिक कार्यात मदत करणे हाच मुख्य हेतु आहे.

**स्वतंत्र वाचन कक्ष:—**

ग्रंथालय विभागामध्ये सर्व सोयीयुक्त स्वतंत्र वाचन कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. स्वतंत्र्य वाचन कक्षामध्ये ६० विदयार्थी बसतिल एवढी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अदयावत माहितीसाठी KRC च्या माध्यमातून दोन संगणक उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच वाचन कक्षामध्ये विविध विषयावरची मासिके व दैनिक वर्तमान पत्रे उपलब्ध केली आहे.

**संदर्भ विभाग :—**

ग्रंथालयामध्ये स्वतंत्र संदर्भ विभाग असून विदयार्थी प्राध्यापक व संशोधकासाठी वेगवेगळया विषयावरचे अनेक संदर्भ ग्रंथ मोठया प्रमाणावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**प्रतिलीपी सेवा (झेरॉक्स सर्विस)**

महाविदयालयीन ग्रंथालयामध्ये विदयार्थी व सर्व सभासंदासाठी प्रतिलीपी सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**संगणकीकृत ग्रंथालय:—**

आजच्या आधुनिक युगामध्ये वाचकांना त्वरीत सेवा देण्याच्या हेतूने यु.जी.सी.अंतर्गत अहमदाबाद येथील INFLIBINET सेंटर म्हणून SOUL या ग्रंथालय SOFTWARE ची खरेदी करण्यात आली असून सत्र २०११—१२ मध्ये ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यात आले.

**OPAC सेवा :—**

ग्रंथालय संगणकीकरणामुळे OPAC सेवेच्या माध्यमातून पुस्तकांची माहिती शोध घेणे सोईचे झाले महाविदयालयीन ग्रंथालयाच्या माध्यमातून खालील सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. संदर्भ सेवा, देवघेव सेवा, ग्रंथ सुची सेवा, इ.मेल.सेवा, इंटरनेट सेवा. ग्रंथ हेच गुरू या उक्तीप्रमाणे वाचकांना अद्यावत माहिती आणि सेवा कमीतकमी वेळेत उपलब्ध करून देणे हेच खरे सेवाकार्य आमच्या महाविदयालयात ग्रंथालय विभगामार्फत केले जाते.

-प्रा.गजानन घायाळ

# विज्ञान विभाग

महाविद्यालयात सन २०११ पासून बी.एस्सी. चे वर्ग सुरु झाले. या अंतर्गत वनस्पती शास्त्र, संगणक शास्त्र, प्राणी शास्त्र, सूक्ष्मजीव शास्त्र, गणित, पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र या विषयातून बी.एस्सी. पदवी मिळवण्याची सोय आहे. सर्व विज्ञान विषयासाठी तज्ञ प्राध्यापक वर्ग, सुसज्ज प्रयोगशाळा उपलब्ध असल्यामुळे ग्रामीण भागातील युवकांचा ओढा प्रस्तुत महाविद्यालयात प्रवेश मिळवण्याचा दिसून येतो.

विज्ञान शाखेच्या विविध विभागाच्या विद्यार्थ्यांत संशोधक वृत्ती विकसित व्हावी म्हणून अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात येते, यात प्रामुख्याने वेरूळ लेणी परिसर दौरा, लोणार सरोवर दौरा, ईश्वेद बायोटेक इंडस्ट्री भेट इत्यादी.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परीक्षा निकाल

महाविद्यालयाच्या कला शाखेचा गतवर्षीचा म्हणजे सन २०१४-२०१५ चा बी.ए. तृतीय वर्षाचा निकाल ४० टक्के इतका लागलेला आहे. एकूण २५ विद्यार्थीनी परीक्षेला बसल्या होत्या त्यापैकी १० विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या आहेत. निकालाचा विषयावर विचार केल्यास, अर्थशास्त्र विभागाचा ८१.२५ टक्के; इंग्रजी साहित्य विषयाचा ३७.५० तर टक्के; इंग्रजी विषयाचा ५६ टक्के; गृहअर्थशास्त्र विषयाचा ६६.६७ टक्के; इतिहास विषयाचा १०० टक्के; राज्यशास्त्र विषयाचा ८५.७१ टक्के; समाजशास्त्र विषयाचा ८८.८९ टक्के; मराठी विषयाचा ८४ टक्के आणि मराठी साहित्य विषयाचा ९२.८० टक्के निकाल लागलेला आहे.

महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा गतवर्षीचा म्हणजे सन २०१४-२०१५ चा बी.एस्सी. तृतीय वर्षाचा निकाल ४१.८२ टक्के इतका लागलेला आहे. एकूण पंचावन्न विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालाचा विषयावर विचार केल्यास, वनस्पतिशास्त्र विभागाचा ६६.६७ टक्के; रसायन शास्त्र विषयाचा ६०.७८ तर टक्के; संगणक शास्त्र विषयाचा २५.०० टक्के; सूक्ष्मजीवशास्त्र विषयाचा ६४.०० टक्के; गणित विषयाचा ६.२५ टक्के; पदार्थविज्ञान विषयाचा १२.५० टक्के आणि प्राणी शास्त्र विषयाचा ५७.८९ टक्के निकाल लागलेला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय खासदार प्रतापराव जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

**B.A.III Admission List 2015 -16**

| S.NO | Name of Student | ENG | MAR | ECO | HIS | POL | MLT | SOC | HEC | ELT |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Pornima Gajanan Deshmukh | ENG | MAR | ECO | | | MLT | SOC | | |
| 2 | Jyoti Keshao Jadhao | ENG | MAR | ECO | | POL | | SOC | | |
| 3 | Kavita Shriram Manghale | ENG | MAR | | HIS | | MLT | | HEC | |
| 4 | Ashwini Sopan Ambhore | ENG | MAR | | HIS | POL | | SOC | | |
| 5 | Manisha Santosh Khadsan | ENG | MAR | ECO | | | MLT | | HEC | |
| 6 | Ashwini Sunil Ingle | ENG | MAR | | HIS | POL | | SOC | | |
| 7 | Puja Prabhakar Nimbekar | ENG | MAR | ECO | | POL | | | HEC | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | Santoshi Shriram Nikam | ENG | MAR | ECO | | | MLT | | HEC | |
| 9 | Shalini Bhima Chavhan | ENG | MAR | | HIS | | MLT | | HEC | |
| 10 | Punam Vishnu Dhande | ENG | MAR | ECO | | | MLT | | HEC | |
| 11 | Sanjivani Murlidhar Mapari | ENG | MAR | | HIS | | MLT | SOC | | |
| 12 | Rupali Sukhdev Magar | ENG | MAR | | HIS | POL | | SOC | | |
| 13 | Ashwini Bhanudas Debaje | ENG | MAR | ECO | | POL | | SOC | | |
| 14 | Ashwini Rambhau Gaikwad | ENG | MAR | ECO | | POL | | SOC | | |
| 15 | Pooja Manohar Tanmane | ENG | MAR | ECO | | POL | | | HEC | |
| 16 | Reshama Bhagwat Jadhao | ENG | MAR | | HIS | | MLT | | HEC | |
| 17 | Seema Sanjay Arakh | ENG | MAR | | HIS | | MLT | | HEC | |
| 18 | Amrapali Atmaram Gawai | ENG | MAR | | HIS | | MLT | | HEC | |
| 19 | Manisha Suresh Awsarmol | ENG | MAR | ECO | | POL | | SOC | | |
| 20 | Sneha Devidas Pise | ENG | MAR | ECO | | | MLT | | HEC | |
| 21 | Priyanka Vyanktesh Lahane | ENG | MAR | ECO | | POL | | SOC | | |
| 22 | Puja Bhagwan Katare | ENG | MAR | | | POL | | SOC | | ELT |
| 23 | Pranali Ramkrushna Gaikwad | ENG | MAR | | HIS | | MLT | SOC | | |
| 24 | Shital Rameshwar Devkar | ENG | MAR | ECO | | | | | HEC | ELT |
| 25 | Swati Sanjay Deshmukh | ENG | MAR | | HIS | | | SOC | | ELT |
| 26 | Archana Sahebrao Tangde | ENG | MAR | ECO | | POL | | SOC | | |
| 27 | Kiran Achutrao Waghmare | ENG | MAR | ECO | | POL | | SOC | | |
| 28 | Kiran Sukhdev More | ENG | MAR | | HIS | POL | | | HEC | |
| 29 | Priti Raju Ghanwat | ENG | MAR | ECO | | | | | HEC | ELT |
| 30 | Priti Sukhdev Bajad | ENG | MAR | | HIS | | MLT | | HEC | |
| 31 | Puja Nagesh Thakare | ENG | MAR | | HIS | | MLT | | HEC | |
| 32 | Suvarna Vasant Gawai | ENG | MAR | ECO | | POL | | SOC | | |
| 33 | Madhuri Lahu Gawai | ENG | MAR | | HIS | POL | | | HEC | |
| 34 | Diksha Bharat Hiwale | ENG | MAR | ECO | | | MLT | SOC | | |
| 35 | Archana Suresh Kyaval | ENG | MAR | ECO | | POL | | | HEC | |
| 36 | Ashwini Devidas Sarkate | ENG | MAR | ECO | | POL | | | HEC | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 37 | Asha Bhagwan Narwade | ENG | MAR | ECO | | POL | | SOC | | |
| 38 | Sangita Sheshrao Tanpure | ENG | MAR | | HIS | POL | | SOC | | |
| 39 | Priti Namdev Barhate | ENG | MAR | ECO | | POL | | SOC | | |
| 40 | Nanda Bhikaji Lambe | ENG | MAR | | HIS | POL | | SOC | | |
| 41 | Priti Shriram Dhore | ENG | MAR | | HIS | | | SOC | | ELT |
| 42 | Kiran Babanrao Dhore | ENG | MAR | | HIS | POL | | SOC | | |
| 43 | Snehal Dilip Gawai | ENG | MAR | ECO | | | MLT | | HEC | |
| 44 | Dipali Vishwnath Awsarmol | ENG | MAR | ECO | | POL | | | HEC | |
| 45 | Dipali Prakash Dungu | ENG | MAR | ECO | | | | | HEC | ELT |
| 46 | Sarla Nagesh Jadhao | ENG | MAR | ECO | | | MLT | | HEC | |
| 47 | Shubhangi Shankarrao Yewle | ENG | MAR | | HIS | | MLT | | HEC | |
| 48 | Pushpa Nimbaji Gaikwad | ENG | MAR | | HIS | POL | | | HEC | |
| 49 | Ashwini Raju Changade | ENG | MAR | ECO | HIS | | | SOC | HEC | |
| 50 | Kanchan Janardhan Jamdhade | ENG | MAR | ECO | | | MLT | | HEC | |
| 51 | Renuka Ashok Tatte | ENG | MAR | | HIS | | MLT | SOC | | |
| 52 | Bharti Vijay Tavde | ENG | MAR | | HIS | POL | | SOC | | |

**B.Sc.III Admission List- 2015-16**

| S.No | Name of Student | Che | Phy | MTh | Cps | Bot | Zoo | MCB |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Puja Ganpat Naik | Che | | | | | Zoo | MCB |
| 2 | Arti Shamrao Thakare | | Phy | MTh | Cps | | | |
| 3 | Soni Anup Magar | Che | | | | Bot | Zoo | |
| 4 | Mayuri Vinayak Dolas | Che | | | | Bot | Zoo | |
| 5 | Vijay Motiram Kale | Che | | | | Bot | Zoo | |
| 6 | Shravan Kisan Nagrik | Che | | | | | Zoo | MCB |
| 7 | Fariya Naj Saiful Isalam | Che | | | | Bot | Zoo | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | Sk Ajahar Akbar Qureshi | Che | | | | Bot | Zoo | |
| 9 | Dipali Shankar Shelke | Che | | | | | Zoo | MCB |
| 10 | Rupali Shankar Shelke | Che | | | | | Zoo | MCB |
| 11 | Anjali Dattatray Deshmukh | Che | | | | | Zoo | MCB |
| 12 | Puja Deviprashad Choudhari | Che | | | | Bot | Zoo | |
| 13 | Nikita Sanjiv Patil | Che | | | | | Zoo | MCB |
| 14 | Swati Sanjay Sultane | Che | | | | | Zoo | MCB |
| 15 | Manisha Satish Rahate | Che | | | | | Zoo | MCB |
| 16 | Pradnya Ganesh Sardar | Che | | | | | Zoo | MCB |
| 17 | Jayshri Sham Rahate | Che | | | | | Zoo | MCB |
| 18 | Dipak Prushittam Rasal | Che | | | | | Zoo | MCB |
| 19 | Neha Ramesh Dawande | Che | | | | | Zoo | MCB |
| 20 | Seema Tejarav Narwade | Che | | | | | Zoo | MCB |
| 21 | Jayshri Nagorao Mawal | Che | | | | Bot | | MCB |
| 22 | Dipali Harihar Shikare | Che | | | | Bot | Zoo | |
| 23 | Aboli Chandrashekar Mehkarkar | Che | | | | | Zoo | MCB |
| 24 | Puja Chintaman Patthe | Che | | | | | Zoo | MCB |
| 25 | Nishganda Dananjay Jamdar | Che | | | | | Zoo | MCB |
| 26 | Kshitija Santosh Deshmukh | Che | Phy | MTh | | | | |
| 27 | Shubham Santosh Deshmukh | Che | | | | Bot | Zoo | |
| 28 | Punam Indar Pakhare | Che | | | | | Zoo | MCB |
| 29 | Shubhangi Sanjay Sillar | Che | | | | Bot | Zoo | |
| 30 | Nikhil Ganesh Chankhore | Che | | | | | Zoo | MCB |
| 31 | Vishakha Basling Dongare | Che | | | | | Zoo | MCB |
| 32 | Shankar Bhagwan Dhande | Che | Phy | MTh | | | | |
| 33 | Priya Subhas Jaitalkar | Che | | | | Bot | Zoo | |
| 34 | Tejaswani Marotirao Nikas | Che | Phy | MTh | | | | |
| 35 | Sneha Subhas Pagore | Che | | | | Bot | Zoo | |
| 36 | Prajakta Sudhakar Rahate | Che | | | | Bot | Zoo | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 37 | Bhagyashri Gajanan Dhokane | Che | | | | | Zoo | MCB |
| 38 | Harsha Samadhan Gade | Che | | | | Bot | Zoo | |
| 39 | Kanchan Sudhakar Wayal | Che | | | | Bot | Zoo | |
| 40 | Manisha Bhikanrao Sawale | Che | | | | Bot | Zoo | |
| 41 | Puja Uamashankar Katkar | Che | | | | Bot | Zoo | |
| 42 | Rupali Vasantrao Mule | Che | | | | | Zoo | MCB |
| 43 | Gopal Vishnu Saswadkar | Che | Phy | MTh | | | | |
| 44 | Sagar Shidhrth Chavhan | Che | Phy | MTh | | | | |
| 45 | Priti Ganpat Sadar | Che | Phy | MTh | | | | |
| 46 | Pallavi Bhagwan Thokare | Che | Phy | MTh | | | | |
| 47 | Kiran Balkrushan Suradkar | Che | Phy | MTh | | | | |
| 48 | Puja Gajanan Gharad | | Phy | MTh | Cps | | | |
| 49 | Sadaf Gauhar Kazi ahmad Hasan | Che | | | | | Zoo | MCB |
| 50 | Komal Sanjabrao Dhande | | Phy | MTh | Cps | | | |
| 51 | Parmeshwar Subhas Ghonge | | Phy | MTh | Cps | | | |
| 52 | Puja Vilas Jumade | Che | Phy | MTh | | | | |
| 53 | Namdeo Nandkishor Kale | Che | Phy | MTh | | | | |
| 54 | Satish Shriram Mane | Che | Phy | MTh | | | | |
| 55 | Nilesh Ashok Jorawar | Che | Phy | MTh | | | | |
| 56 | Varsha Madhukar Dhavade | Che | | | | | Zoo | MCB |




स्वच्छ भारत अभियान अंतर्गत पथनाट्य सादर
करतांना विद्यार्थी



महाविद्यालयीन क्रीडा सप्ताह अंतर्गत कबड्डी
स्पर्धेत सहभागी विद्यार्थीनी



महाविद्यालयीन क्रीडा सप्ताह अंतर्गत हॉलीबॉल
स्पर्धेत सहभागी विद्यार्थी



महाविद्यालयीन क्रीडा सप्ताह अंतर्गत हॉलीबॉल
स्पर्धेत सहभागी विद्यार्थी




स्वच्छता अभियान अंतर्गत बस स्थानक परिसर
स्वच्छ करतांना महाविद्यालयीन विद्यार्थीनी




स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेप्रसंगी मान्यवर

# संत गाडगे बाबांची दशसुत्री



## वैराग्यमूर्ती श्री संत गाडगेबाबा

जयंती : 23 फेब्रुवारी पुण्यतिथी : २० डिसेंबर

## ॥ श्री संत गाडगेबाबांचा दशसूत्री संदेश ॥

| | | | |
|---|---|---|---|
| भुकेलेल्यांना | : अन्न | अंध, पंगू, रोग्यांना | : औषधोपचार |
| तहानलेल्यांना | : पाणी | बेकारांना | : रोजगार |
| उघड्यानागड्यांना | : वस्त्र | पशु, पक्षी, मुक्या प्राण्यांना | : अभय |
| गरीब मुलामुलींना | : शिक्षणासाठी मदत | गरीब तरूण - तरूणीचे | : लग्न |
| बेघरांना | : आसरा | दु:खी व निराशांना | : हिम्मत |

हाच आजचा रोकडा धर्म आहे !

हीच खरी भक्ती व देवपूजा आहे !!

"गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला"